# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ३ रे अंक २६४ वा मंगळवार दि.२६ मार्च २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# डॉ. आंबेडकरांच्या क्रांतीचक्राला पुन्हा गतिमान करूया..! भीमराव आंबेडकर

## बार्टी आणि भारतीय बौद्ध महासभेच्या संयुक्त विद्यमाने माणगांव परिषद संपन्न

(माणगांव --- दिनांक २२ मार्च२०२४) सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीची नव्याने उभारणी करून नव नेतृत्वास पुढे आणणे या हेतूने लोकराजा राजर्षी शाहू महाराज यांच्या पुढाकाराने कोल्हापूर संस्थानातील माणगांव येथे दिनांक २१व २२मार्च १९२०रोजी दक्षिण महाराष्ट्र बहिष्कृत वर्ग परिषदेचे आयोजन कारण्यात आले होते.डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेचे प्रमुख अतिथी राजर्षी शाहू महाराज होते तर कळंबीचे दादासाहेब इनामदार हे स्वागताध्यक्ष होते. या परिषदेची संपूर्ण जबाबदारी शाहू महाराजांनी ज्यांच्यावर सोपविली होती ते माणगावचे सुपुत्र अप्पासाहेब दादगोंडा पाटील यांनी या नियोजनात कोणतीही कमी ठेवली नाही. या परिषदेत शाहू महाराजांनी बहिष्कृत वर्गाला उद्देशून ऐतिहासिक भाषण केले. त्यामध्ये ते म्हणाले की तुम्ही तुमचा पुढारी शोधून काढला आहे.डॉ. आंबेडकर हे केवळ अस्पृश्यांचाच नाही तर संपूर्ण हिंदुस्थानचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत! देशात सामाजिक समतेची पायाभरणी करणाऱ्या या ऐतिहासिक माणगाव परिषदेचा १०४वा वर्धापन दिन डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टीचे महासंचालक सुनीलजी वारे यांच्या मार्गदर्शनात बार्टी आणि भारतीय बौद्ध महासभा जिल्हा कोल्हापूर यांच्या संयुक्त विदयमाने २२मार्च २०२४रोजी महात्मा फुले सभागृह माणगाव येथे आयोजीत करण्यात आला. या कार्यक्रमाचे उदघाट्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू तथा भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. भीमराव आंबेडकर



यांचे हस्ते आणि बार्टीचे विस्तार व सेवा आयबीपीएस विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. यावेळी डॉ. भीमराव आंबेडकर म्हणाले की, शाहू महाराजांचे भाकीत बाबासाहेबांनी पूर्णत्वास नेले. एकादा महापुरुष दुसऱ्या महापुरुषाला ओळखत असून महापुरुषांचे कार्य व विचार पुढे नेण्याचे कार्य या देशातील आंबेडकरवाद्यांनी केले आहे. डॉ. आंबेडकर यांनी जी सामाजिक क्रांती केली तिला पुन्हा गतिमान करण्याची गरज आहे. यासाठी संपूर्ण देशातील आंबेडकरवादयानी पुढे आले पाहिजे.! ऐतिहासिक माणगांव परिषदेच्या या वर्धापन दिन सोहळ्यात आंबेडकरपूर्व कालखंडातील अस्पृश्यांचे पहिले पुढारी, पहिले पत्रकार, विद्रोही साहित्यिक आणि सामाजिक समतेसाठी शंकराचार्यांना जबाब विचारणारे आद्य समाजसुधारक गोपाळबाबा वलंगकर यांच्या जन्मगावी महाड जवळील रावढळ येथे जाऊन १९मार्च २०२४रोजी शासनाची स्वायत्त संस्था असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे या संस्थेने अभिवादन करण्यासाठी पुढाकार घेतला. रावढळ येथे शासकीय पातळीवरून अभिवादन कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण यांचा सन्मान डॉ भीमराव आंबेडकर यांनी केला तसेच भीमराव ते बाबासाहेब या वेब सिरीजसाठी शुभेच्छा दिल्या. प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण यांनी आपल्या अभ्यासपूर्ण भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील अनेक पैलूवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीवर प्रभाव टाकणाऱ्या तत्कालीन विषमतावादी समाजव्यवस्थेबरोबर त्यांच्या कार्याला मानवीय भावनेतून सहकार्य करणारे महाराज सयाजीराव गायकवाड, शाहू महाराज यासह विविध जातीधर्मातील समाजसुधारक, विचारवंत आणि प्रामाणिक कार्यकर्ते यांचा ही महत्वाचा सहभाग आहे. या सर्व व्यक्ती आणि घटनांचा सूक्ष्मपणे अभ्यासआणि संशोधन करून डॉ. आंबेडकर यांचे जीवन कार्य नव्याने जगासमोर आणण्याची गरज आहे. यासाठी 'भीमराव ते बाबासाहेब ' हा महत्वाकांक्षी वेब सिरीज प्रकल्प बार्टीने हाती घेतला आहे. अध्यक्षिय भाषणातून राजेंद्र भोसले यांनी यावेळी खालीलप्रमाणे ठराव मांडले. ऐतिहासिक माणगाव परिषदेत डॉ आंबेडकर यांनी मांडलेल्या तिसऱ्या क्रमांकाच्या ठरावाची अंमलबजावणी सर्व जनतेने करावी, आद्य समाज सुधारक गोपाळ बाबा वलंगकर अभिवादन सोहळा सुरु केल्याबद्दल बार्टी संस्थेचे अभिनंदन आणि दरवर्षी १९मार्च रोजी वलंगकर अभिवादनासाठी सर्व बहुजन समाजाने रावढळ येथे उपस्थित राहावे. टाळयांच्या गजरात वरील सर्व ठरावास संमती देण्यात आली.

बार्टीच्या वतीने लंडन हाऊस प्रतिकृती स्मारकासमोर डॉ बाबासाहेब आंबेडकर व इतर महापुरुषांच्या जीवनावरील मौल्यवान पुस्तके अल्पदरात उपलब्ध करून देण्यात आली होती. या पुस्तक स्टॉलचे उद्घाटन डॉ सत्येंद्रनाथ चव्हाण आणि मान्यवरांच्या यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी याप्रसंगी एस के भंडारे(राष्ट्रीय उपाध्यक्ष),भिकाजी कांबळे(प्रदेशाध्यक्ष), बार्टीतील संशोधक डॉ. प्रेम हनवते, डॉ संभाजी बिराजे, विकास गायकवाड सचिन नांदेडकर, गणेश सव्वाखंडे, रामदास लोखंडे, राहुल कवडे तसेच बार्टीतील कर्मचारी, समतादूत, तसेच आंबेडकर अनुयायी, ग्रामस्थ, समता सैनिक दल व भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . डॉ प्रेम हनवते यांच्या आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

## महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांनी आमदार अमित, धीरज विलासराव देशमुख यांची घेतली भेट

लातूर /प्रतिनिधी : - लातूर लोकसभा मतदारसंघातील कॉंग्रेस पक्ष आणि महाविकास आघाडीचे अधिकृतउमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांनी सोमवार दि. २५ मार्च रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री वलातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची व लातूर ग्रामिणचे आमदार धीरज विलासराव देशमुख यांची सहकाऱ्यांसह घेतली,डॉ. शिवाजी काळगे यांना अभिनंदन करून मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांची प्रतिमा, असा घडलाभारत हा ग्रंथ भेट देऊन या लोकसभा निवडणुकीत ते निश्चितपणे विजयी होतील



असा विश्वास व्यक्त केला यावेळी लातूर शहर जिल्हा कॉंग्रेसचे अध्यक्ष किरण जाधव, माजी महापौर दीपक सूळ, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रवींद्र काळे, डॉ.अशोक पोतदार, डॉ. सतीश बिराजदार, डॉ.राजकुमार दाताळ, डॉ.दीपक गुगळे, डॉ.संजय पौळ, डॉ. दीपक मसलेकर, लातूर तालुका कॉंग्रेसचे अध्यक्ष सुभाष घोडके, राजकुमार जाधव, प्रवीण सूर्यवंशी, लातूर शहर युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष इमरान सय्यद आदीसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.




भक्ती शक्ती मंगल कार्यालयाच्या बाजूला असलेले ग्यानदेव मंगल कार्यालयात मंगल परिणय(विवाह )होणार आहे.

## आ.अमित देशमुख यांची धाराशिव जिल्हा कॉंग्रेस कमिटी व उमरगा तालुका कॉंग्रेस कमिटी शिष्टमंडळाने घेतली भेट विविध विषयावर केली चर्चा

लातूर / प्रतिनिधी :- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची सोमवार दि. २५ मार्च रोजी सकाळी बाभळगाव निवासस्थानी धाराशिव जिल्हा कॉंग्रेस कमिटीव उमरगा तालुका कॉंग्रेस कमिटी शिष्टमंडळाने भेट घेऊन त्यांच्याशी विविध विषयावर चर्चा केली. याप्रसंगी धाराशिव जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष धीरज पाटील, लातूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे सचिव अभय साळुंखे, युवा नेते अशलेष मोरे, उमरगा तालुका कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुभाष राजुळे, विजयकुमार सोनवणे, नानाराव भोसले, नितीन कोराळे, विशाल काणेकर, बलभीम पाटील, मधुकर यादव, गिरीष पाटील, संजय चालुक्य, विकास हाराळकर, दिलीप सगरे, महेश देशमुख, महेश जाधव आदीसह धाराशिव जिल्हा कॉंग्रेस कमिटी व उमरगा तालुका कॉंग्रेस कमिटीचे विविध पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी मंत्री आमदार अमित देशमुख म्हणाले की, देशात सार्वत्रिक निवडणुका सुरू झालेल्या आहेत. देशात राज्यात धाराशिव जिल्ह्यात जी उलथापालथ झाली त्याचे पडसाद आज मला येथे दिसतात, मी अनेकांचे मनोगत ऐकले मोकळा श्वास काय असतो हे अनेकांना जाणवले. आमचे पदाधिकारी तुमच्या संपर्कात आहेत, देशातील सार्वत्रिक निवडणुकीत आपणाला एक विचार



स्वीकारण्याची आता वेळ आलेली आहे, देशात इंडिया आघाडी तर राज्यात महाविकास आघाडी निवडणुका लढवत आहे असे त्यांनी यावेळी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले की, धाराशिव लोकसभा मतदारसंघासाठी महाविकास आघाडी कडून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अधिकृत उमेदवार माजी स्नेही ओमराजे निंबाळकर उभे आहेत आपणाला अगोदर महाविकास आघाडीचा आघाडी धर्म पाळा वयाचा आहे, आणि विजयश्री खेचून आणायचे आहे. लातूर लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार डॉ. शिवाजी काळगे हे उमरग्याचे जावई आहेत, लोकनेते विलासराव देशमुख, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या काळापासून लातूर उमरगाचे ऋणानुबंध आहेत. महाविकास आघाडीचा झेंडा राज्यातील लोकसभेच्या जागेवर फडकला पाहिजे. अशलेष मोरे यांच्याकडे उत्तम संघटन कौशल्य आहे, समाजाशी नाळ जोडलेला हा कार्यकर्ता आहे त्यांना पाठबळ कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून मिळेल सर्वांनी धाराशिव व लातूर लोकसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीच्या प्रचाराच्या कामाला लागावे असे ते म्हणाले. ते म्हणाले की, राज्यातसध्या जे चालू आहे ते मावळणार आहे व नवी पहाट येणार आहे. त्या नव्या पहाटेचे साक्षीदार आपण होणार आहोत. आपणाला महाराष्ट्र पुढे घेऊन जायचा आहे, आपली मातीशी नाळ जुळलेली आहे, जे मातीला बेईमान झाले ते निघून गेले ज्यांनी इमान राखले ते आज येथे आहेत. सर्वांच्या खांद्याला खांदा लावून मी तुमच्यासोबत उभा आहे अशी ग्वाही देऊन त्यांनी सर्वांना देऊन भविष्यातील कारकिर्दीच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी धाराशिव जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष धीरज पाटील, लातूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे सचिव अभय साळुंखे, युवा नेते अशलेष मोरे कॉंग्रेस पदाधिकारी कार्यकर्त्यांनी धाराशिव जिल्ह्यातील नेते भाजपात गेले पण कॉंग्रेस पदाधिकारी,कार्यकर्ते जागीच आहेत माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी धाराशिव जिल्हा व उमरगा लोहारा तालुक्याच्या पाठीशी राहावे असे मनोगत व्यक्त केले शेवटी बैठकीचे आभार गिरीश पाटील यांनी मानले.

## अल्पभुधारक शेतकऱ्याचा मुलगा झाला अधिकारी, आई वडिलांच्या घामाचं केलं सोनं

चांदवड : सुनिल थोरे तालुक्यात पाट पाण्याची व्यवस्था नाही, जानेवारी उजाडताच विहीरी तळ दाखवतात, पर्जन्याच्या लहरीपणाचे हिंदोळे त्यात कधी तरी हसवणारा लाल कांदा हे नगदी पीक अन् त्यावरच कुटुंबाची गुजरान अशाही विपरीत परिस्थितीत खंबीरपणे उभे राहून मुलाला लढ म्हणून बळ देणाऱ्या रेडगाव खुर्द येथील अल्पभुधारक शेतकरी बापाच्या मुलाने जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी पदाला गवसणी घालून आई वडीलांच्या घामाच सोनं केले आहे. एकेकाळी आदर्श गावाचा लौकिक लाभलेलं व स्वामी यादव महाराजांच्या कर्म फळाने वारकरी सांप्रदायात चांगले लौकिक पावलेलं गाव म्हणजे रेडगाव खुर्द परंतु दुष्काळाच्या झळा मात्र नेहमीच्याच. अशाही परिस्थितीत हार न मानता अल्पभुधारक शेतकरी उत्तम सावळीराम काळे यानी इतरां प्रमाणे निसर्गाचे हिंदोळे घेत चार मुलींचे लग्न करुन मुलाला अधिकारी होण्यासाठी बळ देण्या खंबीर राहीले. वयाच्या अकराव्या वर्षी पित्रुछत्र हरपल्या नंतर जी शेतीशी नाळ जोडली ती ७६ वर्षात पण कायम आहे. तब्बल ६५ वर्ष म्हणजे नोकरीचा विचार करता दोनदा निवृत्ती इतका काळ कष्टात गेला. वडील उत्तम काळे यांचे ५ वी तर आई ताराबाईंचे ४ थी शिक्षण झालेल्या मातापित्यांचा ऋषिकेश हा सुरवातीपासुनच हुशार, त्याचे प्राथमिक शिक्षण येथील जि. प. शाळेत तर माध्यमिक शिक्षण काजीसांगवीच्या जनता विद्यालयात व लासलगावच्या लोकनेते दत्ताजी पाटील विद्यालयात झाले. पुढे १२ वी नंतर के. के. वाघ येथे इंजिनियरींगचे शिक्षण पुर्ण केले.

## संपादकीय....

# वणवे टाळू, विनाश थांबवू!

– सचिन ओव्हाळ वणव्यांमुळे देशात दरवर्षी वनसंपदेची अपरिमित हानी होत असते. वणवे लागण्यापेक्षा लावले जाण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. महाराष्ट्रात ही समस्या प्रकर्षाने भेडसावत आहे. त्यामुळे नापिकी, पशुधनाची हानी, भूजलपातळी खालावणे असे परिणाम जाणवत आहेत.महाराष्ट्रात सगळीकडे डोंगरमाथ्यांवर इथून पुढे दीड–दोन महिने वणवे लागलेले दिसायला लागतील. जंगलांना वणवे लागण्याचा काळ म्हणजे प्रामुख्याने जानेवारी ते एप्रिल असा चार महिन्यांचा काळ असतो. पर्यावरणाच्या दृष्टीने वणवा हा अतिशय चिंताजनक विषय आहे. भारतीय वन सर्वेक्षणाच्या अहवालानुसार, महाराष्ट्र वणवा लागण्याच्या बाबतीत देशात अव्वल आहे.फेब्रुवारी व मार्चमधील अवघ्या पाच आठवड्यांत महाराष्ट्रातील अरण्यांच्या दीड हजार ठिकाणी वणवे लागले. ही संख्या देशातील कमी वेळात सर्वात जास्तीच्या आगी म्हणून नोंदवली गेली आहे. भारतीय अरण्य सर्वेक्षण संस्थेच्या (एफएसआय) अहवालानुसार, मागील वर्षी जानेवारीपासून मार्चपर्यंत देशात २२ हजार १२८ वणवे लागले, असे सांगण्यात आले.याच कालावधीत महाराष्ट्रात दोन हजार ४८८ वणवे लागल्याची नोंद झाली आहे. 'एफएसआय'च्या माहितीप्रमाणे, यातील बरेचसे वणवे हे मानवाकडूनच लावले गेले आहेत. अरण्यातील दाट झाडींना मुद्दाम आगी लावल्या जात आहेत. वणवा लागणे हा नैसर्गिक पंधरा टक्के आणि मानवनिर्मित पंच्च्याऐंशी टक्के आहे. यातूनच जंगलांबाबतची उदासीनता दिसून येते. सातारा, कोकण आणि पुणे जिल्ह्यात कुरण क्षेत्र जास्त असून, या भागात मानवनिर्मित वणव्यांचे प्रमाण अधिक आहे. याबाबत अनेक चुकीचे समज आणि अनास्था जाणवते. या भागातील शेतकरी जास्त प्रमाणात वणवे लावत असतात, असे दिसून येते. शेतातील बांधाचे वाढलेले गवत पेटवणे, तरवे अथवा वाफे पेटवणे यांच्यासाठी लावलेल्या आगीतून डोंगरांना वणवे लागत आहेत. परंतु हे लागलेले वणवे विझवणे किंवा डोंगरांना वणवेच लागू नयेत, यासाठी मात्र कुठल्याही प्रकारची खबरदारी घेतली जात नाही किंवा उपाय योजले जात नाहीत.डोंगरांना किंवा कुरणांना लागलेले वणवे हे सहजासहजी विझवणे शक्य नाही. वणवा लागलेल्या भागात उंच डोंगरांवर, आड भागात पोहोचणे अवघड जाते. आग नियंत्रणात आणण्यासाठी काय सामग्री वापरायची, यासाठीच्या साहित्यांसाठीच्या आर्थिक नियोजनाची कमतरता, यामुळे आग विझवणे अवघड होते. त्यामुळे वणवा लागूच नये, यासाठी काम करण्याची प्रकर्षाने आवश्यकता आहे.नैसर्गिकरित्या वणवे लागणे इतकी आपल्याकडे घनदाट आणि हजारो मैल पसरलेली जंगले आपल्याकडे निश्चितच नाहीत. आपल्याकडे डोंगरांना, जंगलांना अनवधानाने आग लागण्याचे प्रमाण कमी आहे. आगीमुळे पर्यावरणाची हानी होत आहे. वातावरणातील कार्बन डाय–ऑक्साइड वाढतो आहे. त्यात भर जागतिक तापमानवाढीने पडत आहे. जळालेल्या डोंगरांवरून पहिल्याच पावसात प्रचंड प्रमाणात माती दगड–गोटे मोठ्या प्रमाणात सुपीक जमिनीमध्ये, शेतांमध्ये वाहून येत आहेत. मोठ्या प्रमाणात जमिनीची धूप होत आहे. सर्व डोंगर जाळून टाकण्याचा विपरित परिणाम मोठा दिसत आहे. डोंगरावर उगवलेली अथवा शेतकऱ्यांनी, पर्यावरणप्रेमींनी लावलेली नवीन रोपटी जळून खाक होतात. औषधी वनस्पती, वेली यांचेही मोठे नुकसान होत आहे. हेच चित्र कोकणात पाहिले तर आंब्याच्या आणि इतर फळांच्या बागा मोठ्या प्रमाणावर उद्ध्वस्त होत आहेत. क्षणार्धात मोहर आलेली बाग शेतकऱ्यांच्या डोळ्यासमोर जळून खाक होताना दिसते. तर वन्यजीवांची होणारी हानी तर भरून न निघणारी आहे. कितीतरी पशू–पक्षी वणव्यात भाजून मृत्यूमुखी पडत आहेत.अनेक पक्ष्यांची घरटी पिल्लांसकट जळून जात असतील; कदाचित याच कारणामुळे अनेक पक्ष्यांच्या प्रजातीही नष्ट झाल्या असाव्यात. याची आपल्याला थोडीही जाण व खंत नाही. वणव्याचा पशुपालनावरही मोठ्या प्रमाणात विपरित परिणाम होत असल्याचे जाणवते. सततच्या वणव्यानंतर परिसरातील पशूपालन जास्त खालवलेले दिसते. पशुपालनासाठी पुरेसा चारा उपलब्ध होत नाही. चाऱ्याचा तुटवडा भासतो; परिणामी भाकड जनावरांचे प्रमाण देखील वाढत आहे. पशूपालन अवघड आणि जिकिरीचे होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये उदासीनता वाढत आहे. डोंगर वणव्याने वर पेटतो आहे आणि खाली असलेले लोक ते पाहूनही काहीही करत नाहीत. कोणाला त्याने काहीही फरक पडत नाही. मुलांना पेटता डोंगर पाहून खेळ/गंमत वाटते. याबाबत कोणालाही थोडीही काळजी किंवा खंत वाटत नाही.वणव्याच्या परिणामांची पर्वा कोणालाही नाही. कितीतरी झाडे, औषधी वनस्पती, सरपटणारे प्राणी, कीटक, तृणभक्ष्यी प्राणी, त्यांची अंडी, घरटी जळून त्यांची एक पिढी नष्ट होत असेल. या वणव्यात कितीतरी मोठा संहार होतो, याचा आपण विचारच करत नाही. परंतु याचा उलटा परिणाम पर्यावरणाचा ऱ्हास आणि मानवी जीवनावर होतो आहे. गवत, पालापाचोळा जळून राख झाल्याने जमिनीतील सेंद्रिय घटक नष्ट होतात.वनस्पती पुनर्निर्मितीला बाधा येते. शेतातील चारा खाक झाल्याने जनावरांना चारा मिळत नाही. चाऱ्याअभावी जनावरे भटकतात. अशक्त बनतात. दुभती जनावरे भाकड होतात. पावसाच्या पाण्यासोबत डोंगर माथ्यावरील माती पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहून जाते. जमिनीची सुपीकता कमी–कमी होत जाऊन ओसाड नापीक मुरूमाड माळरान बनायला लागते. जमिनीची धूप होऊन जमिनीची पाणी धारण करण्याची क्षमता नष्ट होत जाते.डोंगरावरून मोठ्या प्रमाणात गाळ, दगड–गोटे शेतात वाहून येतात. शेत नापीक आणि गाळाने भरून जाते. शेतीचे मोठे नुकसान होते. गवत पालापाचोळा जळून गेल्याने पावसाचे पाणी डोंगवरून वेगाने वाहून जाते. शेतात पाणी शिल्लक राहात नाही. भूगर्भातील पाणीपातळी खालावते. विहिरी, तळी वेळेपूर्वीच आटू लागतात. वणवामुक्त परिसर घडवून आणण्याकरिता वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या माध्यमातून जनजागृती केली पाहिजे. संवेदना जागवल्या पाहिजेत. प्रतिबंधक उपाययोजना वनात स्वयंपाकासाठी अथवा शेकोटीसाठी विस्तव पेटवून तसाच जळत ठेवू नये. तसे करण्यापासून दुसऱ्यास परावृत्त करावे. वनात कोणीही बिडी, सिगारेट ओढून त्याची जळती थोटके इतरत्र फेकू नये. वनातील अथवा वनालगतच्या शेतातील वनोपज गोळा करण्यासाठी त्या झाडाखालील पालापाचोळा जाळू नये. अथवा खबरदारी घ्यावी.

# साधनसंपत्ती आहेच, उद्योगही हवे..

प्रदीप महेश्वरी,नैसर्गिक संसाधनतज्ज्ञ, नागपूर विदर्भात नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारित उद्योगनिर्मितीची मोठी क्षमता आहे, मात्र या तिचा वापर करून घेण्यात आलेला नाही. उद्योगांसाठी योजना जाहीर केल्या जातात, मात्र त्यांचे प्रतिबिंब विदर्भात उमटत नाही. येथील विकासाचा अभाव दूर करण्यासाठी आणि बेरोजगारीचा प्रश्न मिटविण्यासाठी उद्योगनिर्मितीच्या दिशेने पावले उचलणे गरजेचे आहे..गेल्या काही वर्षांत विदर्भात मोठे उद्योग आणण्याचे प्रयत्न जोरात सुरू आहेत. या भागात मुबलक प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध आहे. कोळसा, वीज, सुशिक्षित मनुष्यबळाचीही कमतरता नाही, तरीही या भागाकडे आजवर दुर्लक्षच होत आले. गेल्या १० वर्षांत पंतप्रधानांनी विविध प्रकारच्या योजना जाहीर केल्या. कारण काहीही असो, पण त्यांचा लाभ विदर्भाला मिळालेला नाही. यामध्ये गतिशक्ती योजना असो, रिफायिनग क्षमता दुप्पट करणे असो किंवा मोठा टेक्सटाइल्स पार्क उभारणे असो.. १० वर्षांत विदर्भाला फार काही मिळालेले नाही. गेल्या दोन–तीन वर्षांत मात्र आणि जिल्ह्यांत मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांच्या सततच्या प्रयत्नांमुळे मोठी गुंतवणूक येऊ लागली आहे. गडचिरोली जिल्ह्यात स्टील, सिमेंट आणि खाण क्षेत्रात दोन लाख कोटींची गुंतवणूक करता येऊ शकते, असा विश्वास उपमुख्यमंत्री यांनी व्यक्त केला आहे. या जिल्ह्यात देशातील सर्वात मोठी 'स्टील सिटी' होण्याची क्षमता असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीवर आधारित प्रकल्प विदर्भात दोन ते तीन लाख प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्माण करू शकतात आणि त्यामुळे कमीत कमी विदर्भाच्या तीन जिल्ह्यांतील बेरोजगारी दूर होऊ शकते. मात्र त्यासाठी विदर्भातील नैसर्गिक साधनसामुग्रीचा योग्य उपयोग केला जाणे गरजेचे आहे. प्रत्येक राज्य आपल्याकडे उपलब्ध असलेल्या साधनसामुग्रीवर आधारित उद्योगांमध्ये गुंतवणूक करत आहे. ओदिशा, गुजरात, उत्तर प्रदेशमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होत आहे. विदर्भातील नैसर्गिक साधनसंपत्ती गेल्या कितीतरी दशकांपासून दुर्लक्षित आहे. कोळसा, वीज, मँगनीज, लोहखनिज सर्व काही विदर्भात असूनही रोजगाराची मोठी समस्या या भागात आहे. १० लाख लहान शेतकरी कुटुंबांपैकी प्रत्येक कुटुंबातील एकाला २५ ते ३० हजार रुपयांचे मासिक उत्पन्न मिळेल, अशी नोकरी देण्याची क्षमता विदर्भात आहे. पण या दिशेने सरकारकडून प्रयत्न होताना दिसत नाहीत.विदर्भातील वनक्षेत्र असलेल्या जिल्ह्यांत प्रकल्प सुरू करताना किंवा तिथे गुंतवणूक करताना तेथील पर्यावरणाचाही विचार करणे आवश्यक आहे. विशेषत: भरपूर जंगल आणि वन्यजीव असणाऱ्या गडचिरोली व चंद्रपूर जिल्ह्यांत होत असलेल्या मोठ्या गुंतवणुकीच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणीय परिणामांचा मुद्दाही महत्त्वाचा ठरतो. मोठी गुंतवणूक आणि मोठे उद्योग पर्यावरणाला धक्का बसू देणार नाहीत याची पूर्णपणे खात्री करून घेतली पाहिजे. जर काही नुकसान होणार असेल तर त्याची भरपाई कशी करता येऊ शकेल, हे पाहण्याचीही गरज आहे. नवीन तंत्रज्ञानामुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या हानीचे पूर्ण मोजमाप आपण करू शकतो. ही मूल्यमापनाची प्रक्रिया जटिल आहे, पण सरकारकडून येणाऱ्या सर्व परवानग्या त्यावरच आधारित असतात. नवीन प्रकल्प पर्यावरणास अधिकाधिक पोषक असावेत, त्यामुळे पर्यावरणाची किमान हानी तरी होऊ नये, अशा अटी सरकारने घालणे आणि त्यांची काटेकोर अंमलबजावणी होत आहे की नाही हे पाहणे, नियमभंग होत असल्यास नियम पाळण्यास भाग पाडणे हे सरकारचे कर्तव्य आहे.खनिज वाहतूक आता रस्तेमार्गे न करता पाणी आणि खनिजाचे मिश्रण करून ते पाईपलाईनने गडचिरोलीमध्ये पोहोचविण्यासंदर्भात नियोजन करण्यात येत आहे. जमिनीच्या आत ही पाईपलाईन असल्यामुळे पर्यावरणाचे फारसे नुकसान होणार नाही. कोणत्याही नव्या प्रकल्पाला परवानगी देण्यापूर्वी कंपनी खनिज उत्खननासाठी कमीत कमी जंगल तोडेल आणि त्याच्या चार पट अधिक नवीन झाडे अन्यत्र लावेल, हे कंपनीकडून मान्य करून घेणे गरजेचे आहे. शासकीय यंत्रणासुद्धा प्रभावशाली रीतीने काम करतील, याची काळजी घेतली पाहिजे. देशात ऊर्जेसाठी कमीत कमी प्रदूषण करणारे पर्याय स्वीकारले जावेत, हरित ऊर्जेचा, नैसर्गिक वायूचा (नॅचरल गॅस) वापर केला जावा, यासाठी पंतप्रधान आग्रही आहेत. गुजरात आणि महाराष्ट्रात नैसर्गिक वायूचा वापर करून मोठे पोलाद प्रकल्प गेल्या किती वर्षांपासून सुरू आहेत. आता महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नांमुळे नैसर्गिक वायूची वाहिनी विदर्भात पोहोचली आहे. गडचिरोलीच्या पोलाद प्रकल्पासाठी कमी दरात नैसर्गिक वायू देऊन कोळसा वापर टाळला जाऊ शकतो आणि पर्यावरण संवर्धनामध्ये मोठा हातभार लावता येऊ शकतो. काही दिवसांपूर्वीच चंद्रपूरजवळ सीबीएमचा (कोल बेड मिथेन) मोठा साठा मिळाला आहे. हासुद्धा नैसर्गिक वायूचाच प्रकार आहे. ओएनजीसीसारख्या गॅस क्षेत्रातील मोठ्या कंपनीला निमंत्रित करून उद्योगासाठी कमी दरात गॅस पुरवठा करून पर्यावरणाची हानी कमीत कमी राखता येऊ शकते. मोठे प्रकल्प वायू प्रदूषण करतात. या प्रदूषणावर नियंत्रिण ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी अलीकडे एक विशिष्ट प्रकारची बांबू लागवड केली जात आहे. हा बांबू अन्य झाडांपेक्षा चारपट अधिक कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेत असल्याचे सांगण्यात येते. खाण क्षेत्रात आणि प्रदूषणकारी प्रकल्पांच्या जवळ मोठ्या प्रमाणात बांबूसारख्या झाडांची लागवड करून प्रदूषण नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते. पाण्याचा पुनर्वापर, जास्तीत जास्त हरित ऊर्जेचा वापर, जमिनीखाली पाइपलाइन टाकून खनिज वाहतूक, कचऱ्याचा पुनर्वापर करून प्रदूषण कमी करणे व ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे आवश्यक आहे.आपल्याकडे पूर्वी इंग्रजांची राजवट होती. त्यांनी आपल्या आवश्यकतेनुसार सागवानाची लागवड केली होती आणि त्याची निर्यात त्यांच्या देशात केली जात होती. आता २५–३० वर्षांत तयार होणारे सागवान किंवा ४–५ वर्षांत तयार होणारे व जास्त कार्बन डाय ऑक्साइड शोषणारे बांबू यांचा तुलनात्मक अभ्यास करणे आवश्यक आहे. विदर्भात मोठे प्रकल्प स्थापन करणे जेवढे महत्त्वाचे आहे, तेवढेच पर्यावरणाचे संतुलन राखणेही गरजेचे आहे. शिक्षणामुळे जागरूकता वाढते आणि आपल्या हितरक्षणासाठी तटस्थपणे तर्कशुद्ध विचार करणे शक्य होते, त्यामुळे शिक्षणावर भर देणे अपरिहार्य आहे.विदर्भात नैसर्गिक वायूवर आधारित उद्योगनिर्मितीची मुबलक क्षमता आहे. मात्र सध्या तरी फक्त कोळशावर आधारित ऊर्जेवर विदर्भातील उद्योग अवलंबून आहेत. आता नैसर्गिक वायूची वाहिनी नागपूरमध्ये पोहोचली आहे


# लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी, पोलिस यांनी मनुस्मुर्ती समर्थक बनू नये.

निवडणूक आयोग आता निपक्षपाती राहिला नाही.तो संविधानाच्या चौकटीत स्वताचे अधिकार वापरण्यास असमर्थ असेल तर तो.हाता खालील इतर अधिकाऱ्यांनी निपक्षपाती काम करावे असे सांगण्याच्या लायकीचा तो नसणार आहे.त्यांनी माननीय टी.एन.शेषन यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला पाहिजे.मुख्य निवडणूक आयुक्त काय करू शकतो हे देशाला दाखवून दिले पाहिजे. आजचे राजकीय नेते मनुवादी मानसिकतेचे असतील तर त्अयावर अंकुश ठेवण्धियाचे काम निवडणूक आयोगाचे आहे.अधिकारी कर्मचारी जर मनुस्मुर्ती समर्थक असतील तर ते राज्यघटना,संविधानाची अंमलबजावणी होऊ देणार नाहीत.यांचा अनुभव आता `तकरी,कामगार,सेवानिवृत सैनिक,सुशिक्षित तरुण,बेरोजगार तरुण,जिल्हा परिषद शिक्षक,विना अनुदानीत बी एड,झालेले शिक्षक,आरोग्य सेवा देणारे डॉक्टर,कामगार,अंगणवाडी सेविका,आशा वर्कर,क्रीडा क्षेत्रातील खेळाडू सर्वानीच भारतीय नागरिक म्हणून अनुभव घेतला असेल यात शंका नाही.त्यामुळे निपक्षपाती निवडणुका हा एका व्यक्तीचा नव्हे तर देशाचा प्रश्न आहे.त्यासाठी लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी जर मनुस्मुर्ती समर्थक असतील तर?.ते देशाच्या नागरिक मतदारांचा आणि सविधानाच्या विश्वासाचा खून करण्यास जबाबदार असणार आहेत. करिता अधिकारी कर्मचारी यांनी कोणत्याही दडपणाखाली आणि प्रलोबनाला बळी न पडता कर्तव्य पार पडावे.लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी,पोलिस यांनी मनुस्मुर्ती समर्थक बनू नये. आज भारतीय हिंदू मोदीच्या चरणी अर्पन झाला आहे.हा कमालीचा स्थितिशील असणारा,टिकून राहण्याचा लोकविलक्षण चिवटपणा,दाखविणारा आणि लोकसंख्येत ८५ टक्के असणारा हिंदुसमाज मनाने आधुनिक व गतिमान कसा करावा,हा आज स्वताला सेक्युलॅरिझम समजणाऱ्या लोकां समोरील सर्वात मोठा प्रश्न आहे.हा दीर्घकाळ चालणारा खरा अटीतटीचा लढा आहे. एवढा चिवट असलेला हिंदुसमाज मनाने कमालीचा असहिष्णू व तितकाच कमालीचा क्रूर असूनही उदारमतवादी व सहिष्णू म्हणून ओळखला जातो. तोंडाने सर्वधर्मी समानता आणि आत्म्याचे अद्वैत सांगणाऱ्या या समाजाने दोन हजार वर्षे काही कोटी शूद्र,अति शूद्र आदिवासींना संस्कृतीच्या कक्षेच्या आत गुलाम करून टाकले होते.स्त्रियांची गुलामी हा पुन्हा वेगळाच भाग आहे. लक्षवेधी रुपये खर्चून मीनाक्षीसुंदरम आणि वेरूळची देवालये निर्माण करणाऱ्यांनी समाजात वरिष्ठ वर्गाच्या उपभोगासाठी दासी,बटकी आणि वेश्या मिळून जगातील सर्वात मोठा समूह निर्माण केला होता ! उदार हिंदूसंस्कृतीत इंग्रजांनी कायद्याने बंद करीपर्यंत म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत माणसांच्या खरेदीविक्रीचे बाजार गुरांच्या आठवडी बाजाराप्रमाणे भरत होते.तसेच आता शहराच्या नाक्या नाक्यावर चौकात श्रम विकणारे बाजार भरत असतात.एकेक पुण्यश्लोक राजा केवळ धर्मप्रेमाखातर पाचपाचशे मुली देवळांना देवदासी म्हणून नजर करीत असे ! शत्रूंची बायका–मुले पकडून गुलाम करावी, ही प्रथाही भारतात होती. हिंदुसमाजात हे सर्व काही होते,याबद्दल मी हिंदुसमाजाला फार दोषी धरत नाही; कारण हेच चित्र मध्ययुगातील ख्रिश्चनांचे व मुसलमानांचे आहे.मी आपल्याच धर्मातील मेंदूतील ब्लॅक (इश्रेलज्ञ) काढण्याचा प्राथमिक प्रयत्न करीत आहे.तो या निमित्याने लिहून सांगण्याचा प्रयत्न करतो.असो... भारतात केवळ बाह्य स्वरुपात नव्हे, तर प्रत्यक्षात लोकशाही अस्तित्वात यावी अशी जर आपली इच्छा असेल,तर त्यासाठी आपण काय करायला हवे? माझ्या मते पहिली गोष्ट जी केलीच पाहिजे ती अशी की, आपल्या सामाजिक आणि आर्थिक उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आपण संवैधानिक मार्गांचीच कास धरली पाहिजे.याच अर्थ हा की,क्रांतीचा रक्तरंजित मार्ग आपण पूर्णत: दूर सारला पाहिजे.याचा अर्थ कायदेभंग,असहकार आणि सत्याग्रह या मार्गांना आपण दूर ठेवले पाहिजे. आर्थिक आणि सामाजिक उद्दिष्टपूर्तीसाठी संवैधानिक मार्गासारखा कोणताही मार्ग शिल्लक नव्हता,त्यावेळी असंवैधानिक मार्गाचा अवलंब करण्याचे समर्थन मोठ्या प्रमाणात केले जात होते.परंतु जेव्हा संवैधानिक मार्ग उपलब्ध आहेत तेव्हा या असंवैधानिक मार्गांचे समर्थन होऊ शकत नाही. हे मार्ग इतर काही नसून अराजकतेचे व्याकरण आहे आणि जितक्या लवकर आपण त्यांना दूर सारु तेवढे ते आपल्या हिताचे होईल.असे आत्मविश्वासाने बाबासाहेबांनी शेवटच्या भाषणात सांगितले होते.

बाबासाहेब पुढे असे सांगतात दुसरी महत्वाची गोष्ट, जिचे पालन केले पाहिजे ती अशी की, लोकशाहीच्या संवर्धनात आस्था असणाऱ्या सर्वांना जॉन स्टुअर्ट मिल यांनी दिलेला सावधगिरीचा इशारा लक्षात ठेवावा लागेल. त्यांच्या मते, लोकांनी आपले स्वातंत्र्य कितीही मोठा माणूस असला तरी त्याच्या चरणी अर्पण करता कामा नये.तसेच त्याच्यावर इतका विश्वास ठेवू नये,की जेणे करुन त्याला प्राप्त अधिकारांचा तो लोकांच्या संस्था उदध्वस्त करण्यासाठी उपयोग करील. संपूर्ण आयुष्य देशसेवेसाठी व्यतित केलेल्या महापुरुषांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्यात काहीच गैर नाही.परंतु कृतज्ञता व्यक्त करण्यालाही मर्यादा असल्या पाहिजेत.आयरीश देशभक्त डॅनियल ओकॉनेल यांनी समर्पकपणे म्हटल्याप्रमाणे, कोणताही माणूस स्वाभिमानाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही, कोणतीही स्त्री स्वत:च्या शीलाचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही आणि कोणताही देश स्वत:च्या स्वातंत्र्याचा बळी देऊन कृतज्ञता व्यक्त करु शकत नाही. इतर देशांच्या तुलनेत भारताला सावधगिरीचा इशारा लक्षात घेणे अधिक गरजेचे आहे,कारण भारतात भक्ती किंवा जिला भक्तीचा मार्ग म्हणता येईल तो, किंवा विभूतीपूजा ही जगातील इतर कोणत्याही राजकारणात दिसणार नाही,इतक्या मोठ्या प्रमाणात भारतीय राजकारणात दिसते. धर्मातील भक्ती ही आत्म्याच्या मुक्तीचा मार्ग असू शकेल. परंतु राजकारणात भक्ती किंवा व्यक्तिपूजा ही अध:पतन आणि अंतिमत: हुकूमशाहीकडे नेणारा हमखास मार्ग ठरतो.तिसरी गोष्ट आपण केली पाहिजे ती अशी,की केवळ राजकीय लोकशाहीवर आपण समाधान मानता कामा नये. आपल्या राजकीय लोकशाहीचे आपण एका सामाजिक लोकशाहीत सुद्धा परिवर्तन करायलाच हवे. राजकीय लोकशाहीच्या मुळाशी सामाजिक लोकशाहीचा आधार नसेल, तर ती अधिक काळ टिकू शकणार नाही.सामाजिक लोकशाही म्हणजे काय? तो एक जीवन मार्ग आहे, जो स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांना जीवनतत्वे म्हणून मान्यता देतो. स्वातंत्र्य,समता आणि बंधुता ह्या तत्वांचा एका त्रयीची स्वतंत्र अंगे म्हणून विचार करता येणार नाही. ते त्रयीचा एक संघ निर्माण करतात, ते या अर्थाने की, त्यापैकी एकाची दुसऱ्यापासून फारकत करणे म्हणजे लोकशाहीचा मूळ उद्देशच पराभूत करणे होय.निपक्षपाती निवडणुका हे लोकशाही देशातील सर्वात मोठी यंत्रणा आहे तीच जर भ्रष्ट झाली तर देशाचा सत्यानाश होण्यास वेळ लागणार नाही.म्हणूनच लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी जर मनुस्मुर्ती समर्थक नसावे.याची दक्षता मुख्य निवडणूक आयुक्तांनी घेतली पाहिजे.

आजच्या परिस्थितीत देशातील समतेपासून स्वातंत्र्य वेगळे करता येत नाही.समतेशिवाय स्वातंत्र्य म्हणजे काही लोकांचे बहुतांश लोकांवर प्रभुत्व निर्माण करणे होय; स्वातंत्र्याशिवाय समता ही वैयक्तिक कर्तृत्वाला मारक ठरेल.बंधुत्वाशिवाय स्वातंत्र्य आणि समता स्वभाविकरित्या अस्तित्वात राहणार नाहीत, त्यांच्या अंमलबजावणीसाठी पोलिस यंत्रणेची गरज भासेल.भारतीय समाजात दोन बाबींचा पूर्णत: अभाव आहे ही वस्तुस्थिती मान्य करुनच आपण सुरुवात केली पाहिजे. त्यापैकी एक समता आहे. सामाजिक क्षेत्रात आपला समाज हा श्रेणीबद्ध विषमतेच्या तत्वावर आधारित आहे. याचा अर्थ काही लोक वरच्या स्तरावर असतात तर बाकीचे निष्कृष्ट अवस्थेत असतात. आर्थिक क्षेत्रात आपल्या समाजात काही लोका जवळ गडगंज संपत्ती आहे,तर अनेक लोक घृणास्पद दारिद्र्यात जगतात.राजकारणात आपल्याकडे समता राहील परंतु सामाजिक आणि आर्थिक जीवनात विषमता राहील. राजकारणात प्रत्येकाला एक मत आणि प्रत्येक मताचे समान मूल्य या तत्त्वाला आपण मान्यता देणार आहोत.आपल्या सामाजिक आणि आर्थिक जीवनात मात्र,सामाजिक आणि आर्थिक संरचनेमुळे,प्रत्येक माणसाला समान मूल्य हे तत्त्व आपण ई व्ही एम मशीन द्वारे नाकारत राहणार असाल तर निवडणुका घेण्याला काहीच अर्थ राहणार नाही.आपण जर प्रत्येक निवडणुकीत मतदाराच्या मताला नाकारत राहिलो,तर आपली राजकीय लोकशाही आपण धोक्यात आणल्याशिवाय राहणार नाही. ही विसंगती शक्य होईल तेवढ्या लवकर आपण दूर केली पाहिजे. अन्यथा ज्यांना विषमतेचे परिणाम भोगावे लागत आहेत ते सर्व शोषित घटक अतिशय परिश्रमाने निर्माण केलेली राजकीय लोकशाही संरचना उदध्वस्त करतील.हे बाबासाहेबांचे शब्द आज देशात जसेचे तसेच अंमलात येताना दिसत आहेत.लोकशाहीने लोकांच्या मतदानाने लोकांसाठी लोकउपयोगी निर्णय घेण्याचे अधिकार बहाल केले.ते लोकप्रतिनिधी भांडवलदाराच्या रक्षणा करीता गोरगरीबाचा बळी देत आहे. म्हणजे लोकशाही ने दिलेल्या संविधाना नुसार नाही. तर हुकूमशाहीच्या मार्गाने चाललेले मार्गक्रम आहे.मग निपक्षपाती निवडणुका कशा होतील.लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी,पोलिस अधिकारी जर मनुस्मुर्ती समर्थक असतील तर?. सामाजिक आणि मानसिकदृष्ट्या अजूनही आम्ही एक राष्ट्र नाही याची आम्हाला जेवढ्या लवकर जाणीव होईल तेवढे ते आमच्या हिताचे ठरेल.त्यांनतरच एक राष्ट्र होण्याच्या गरजेचा आम्ही गांभीर्याने विचार करु शकू.या ध्येयाप्रत पोहोचणे अतिशय कठीण आहे.अमेरिकेत जातीची समस्या नाही.भारतात जाती आहेत. जाती या राष्ट्रविरोधी आहेत.पहिली गोष्ट त्या समाजजीवनात विभागणी करतात.त्या राष्ट्रविरोधी आहेत कारण त्या जाती–जातीमध्ये मत्सर व तिरस्काराची भावना निर्माण करतात. आम्हाला वास्तवात जर राष्ट्र व्हायचे असेल तर या सर्व अडथळ्यांवर आम्ही मात केलीच पाहिजे.राष्ट्र निर्मिती नंतरच बंधुत्व वास्तवात पाहावयास मिळेल. बंधुत्वा शिवाय असलेली समता आणि स्वातंत्र्य म्हणजे रंगाच्या वरवरच्या थरांसारखा केवळ बाह्य देखावा असेल.स्वातंत्र्य ही आनंदाची बाब आहे याबद्दल शंका नाही. परंतु या स्वातंत्र्याने आपल्यावर फार मोठ्या जबाबदाऱ्या टाकलेल्या आहेत लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी यांनी याचा विसर पडू देता कामा नये.

देशातील या स्वातंत्र्यामुळे,कोणत्याही वाईट गोष्टीसाठी आपल्याला आता इतरांना दोषारोपण करता येणार नाही. यापुढे जर काही वाईट घडले, तर त्यासाठी पोलीस अधिकारी,प्रशासकीय अधिकारी,कर्मचारी यांच्या शिवाय इतर कुणालाही दोषी धरता येणार नाही.लोकसभा निवडणुकीत अनुचित घटना घडण्याचा मोठा धोका आहे. काळ वेगाने बदलतो आहे.आपले लोकसुद्धा, नवनवीन विचारप्रणालींचा मागोवा घेत आहेत.लोकांच्या राज्याचा आता त्यांना कंटाळा येऊ लागला आहे.आता त्यांना लोकांसाठी राज्य हवे आहे.आणि राज्य लोकांचे व लोकांनी निवडलेले आहे किंवा नाही याची चिंता ते करणार नाहीत. ज्या संविधानात आपण लोकांचे, लोकांकरिता निवडलेले शासन या तत्त्वाचे जतन केले आहे ते जर आपल्याला सुरक्षित ठेवायचे असेल, तर आपल्या मार्गात कोणते अडथळे येणार आहेत ते आपण ओळखले पाहिजेत, की जेणेकरुन लोकांनी निवडून दिलेल्या सरकारच्या तुलनेत लोकांसाठी असलेल्या सरकारला लोक प्राधान्य देण्याकडे वळतील. यासाठी पुढाकार घेण्यात आपण दुर्बले ठरता कामा नये. पोलीस अधिकारी,प्रशासकीय अधिकारी,कर्मचारी यांच्या शिवाय इतर कुणालाही निवडणूक यंत्रणेत काम करण्याचा अधिकार नसतो. पोलीस अधिकारी,प्रशासकीय अधिकाऱ्यांची यांना खर्या अर्थाने देशाची सेवा करण्याची संधी असते. म्हणूनच लोकसभा निवडणूक अधिकारी कर्मचारी,पोलीस अधिकारी यांनी मनुस्मुर्ती समर्थक बनून काम करू नये ते स्वतासाठी आणि देशासाठी घातक ठरणार आहे. प्रशासकीय अधिकारी कर्मचारी पोलिस अधिकारी ही एकूण सर्व यंत्रणा भारतात लोकशाही असल्यामुळे संविधानाच्या चौकटीत तयार झाली आहे. मनुवादी विचारांची समाज व्यवस्था हे मान्य करत नाही.हे सर्वानी लक्षात ठेवावे.



********

**सागर रामभाऊ तायडे,**
**भांडूप मुंबई –**
**९९२०४०३८५९,**

# तुम्ही फक्त ऑलिव्ह ऑइलमध्ये शिजविलेले अन्न खाता का? त्याचा शरीरावर काय परिणाम होतो माहित्येय का?



ऑलिव्ह ऑइल जगभरातील स्वयंपाकघरांत एक मुख्य पदार्थ म्हणून सर्रास वापरला जातो. ऑलिव्ह आइलची स्वादिष्ट चव आणि आरोग्य फायद्यांमुळे ते लोकप्रिय आहे. पण, फक्त ऑलिव्ह ऑइल वापरून स्वयंपाक करणे ही खरोखरच चांगल्या आरोग्याची गुरुकिल्ली आहे का? चला ऑलिव्ह ऑइलच्या सेवनाबाबत विज्ञान काय सांगते हे पाहू या. फक्त ऑलिव्ह ऑइलमध्ये शिजविलेल्या अन्नाचे सेवन केल्यास त्याचा आपल्या शरीरावर काय परिणाम होतो हे जाणून घेऊ या ऑलिव्ह ऑइलमध्ये शिजविलेले अन्न खाण्याचे फायदे काय आहेत?हैदराबाद येथील यशोदा हॉस्पिटल्सते वरिष्ठ सल्लागार चिकित्सक व मधुमेह तज्ज्ञ डॉ. के. सोमनाथ गुप्ता यांनी द इंडियन एक्स्प्रेसला माहिती देताना ऑलिव्ह ऑइलच्या सेवनाबाबतच्या सकारात्मक पैलूंवर प्रकाश टाकला. ऑलिव्ह ऑइल हे मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्सने समृद्ध असते. मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्सला चांगले फॅट्स मानले जातात. हे चांगले फॅट्स ऑलिव्ह ऑइलच्या सेवनामुळे मिळणाऱ्या फायद्यांमध्ये मुख्य भूमिका बजावतात. खराब कोलेस्ट्रॉल कमी करणे : मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्स किंवा खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी करण्यास मदत करू शकतात; ज्यामुळे हृदयविकाराचा धोका कमी होतो. जागतिक पातळीवर होणाऱ्या मृत्यूंचे हृदयविकार हे प्रमुख कारण आहे.अँटिऑक्सिडंट पॉवरहाऊस : ऑलिव्ह ऑइलमध्ये व्हिटॅमिन ई आणि पॉलीफेनॉल यांसारखे अँटिऑक्सिडंट्सने समृद्ध घटक आहेत. हे घटक शरीरातील मुक्त रॅडिकल्सशी लढतात. हे मुक्त रॅडिकल्स शरीरातील दाह किंवा सूज आणि दीर्घकाळ टिकणारे आजार होण्यास कारणीभूत ठरू शकतात.ऑलिव्ह ऑइलमध्ये शिजविलेल्या अन्नसेवनामुळे मिळणारे दीर्घकालीन फायदे कोणते?डॉ. गुप्ता यांच्या मते, अभ्यास असे सूचित करतात की, आपल्या आहारात ऑलिव्ह ऑइलचा समावेश केल्याने लक्षणीय दीर्घकालीन फायदे मिळू शकतात.क्रॉनिक डिसीज डिफेन्स : ऑलिव्ह ऑइलचे सेवन आणि हृदयविकार, स्ट्रोक, अगदी काही कर्करोग यांसारख्या दीर्घकालीन आजारांचा धोका कमी करणे यांच्यातील संभाव्य संबंध संशोधनातून समोर आले आहेत.रक्तातील साखरेवर नियंत्रण : ऑलिव्ह ऑइलमधील मोनोअनसॅच्युरेटेड फॅट्स इन्सुलिन संवेदनशीलता आणि रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवण्यात सुधारू घडवून आणू शकतात. संभाव्यतः ते टाईप-२ मधुमेहाचा धोका कमी करू शकतात.अँटी-एजिंग ल्युअर : ऑलिव्ह ऑइलमधील अँटीऑक्सिडंट्समध्ये वृद्धत्वविरोधी गुणधर्म असू शकतात आणि ते संज्ञानात्मक घट होण्यापासून काही संरक्षण देऊ शकतात.


ऑलिव्ह ऑइलचे काही दुष्परिणाम होतात का?ऑलिव्ह ऑइल हा आरोग्यदायी पर्याय म्हणून चमकत असताना, डॉ. गुप्ता यांनी ऑलिव्ह ऑईलचे अति सेवन करण्यापासून सावध केले: उष्मांक चेतना : सर्व फॅट्सप्रमाणे ऑलिव्ह ऑइल कॅलरीजने समृद्ध आहे. त्यामुळे वजन वाढू नये म्हणून ऑलिव्ह ऑइलचे प्रमाणातच सेवन करायला हवे.पचनाच्या समस्या: जास्त प्रमाणात ऑलिव्ह ऑईलचे सेवन केल्याने काही व्यक्तींमध्ये फुगणे किंवा अतिसार यांसारख्या पचनाच्या समस्या उदभवू शकतात. धुरामुळे होऊ शकतो त्रास : ऑलिव्ह ऑइलमध्ये अनेक खाद्यपदार्थ तळताना सामान्य तेलापेक्षा जास्त धूर निर्माण होतो. तसेच, हे तेल खूप उच्च तापमानात दीर्घकाळपर्यंत गरम केल्यास खराब होऊ शकते आणि हानिकारक संयुगे तयार होऊ शकतात.

संतुलित आहारामध्ये ऑलिव्ह ऑइलचा समावेश केल्याने बहुतेक लोकांसाठी असंख्य संभाव्य फायदे होतात. पण, तरीही हे लक्षात ठेवा की, संयम महत्त्वाचा आहे. ऑलिव्ह ऑइलचा स्वयंपाकासाठी प्रमाणात वापर करा आणि निरोगी व वैविध्यपूर्ण आहाराच्या चौकटीत त्याच्या स्वादिष्ट चवीचा आनंद घ्या. ऑलिव्ह ऑइलच्या वापराबद्दल तुम्हाला काही चिंता असल्यास, वैयक्तिक मार्गदर्शनासाठी तुमच्या डॉक्टरांचा किंवा नोंदणीकृत आहारतज्ज्ञांचा सल्ला घ्या.

# पॅकबंद पदार्थांतील 'पाम तेल' तुमच्यासाठी हानिकारक? पाहा तज्ज्ञ काय सांगतात

आपण दररोज नाश्ता, दुपारच्या व रात्रीच्या जेवणासाठी अनेक पदार्थ बनवितो. हे सर्व पदार्थ बनविताना तेलाचा वापर हा होतोच. पण, आपण स्वयंपाकासाठी कोणते तेल वापरतो हेसुद्धा पूर्णपणे आपल्या आरोग्यावर अवलंबून असते. आपल्यातील बरेच जण विचार न करता, स्वस्त मिळतेय म्हणून कोणत्याही कंपनीचे तेल विकत घेतात आणि तेच स्वयंपाक करण्यासाठी वापरतात. बाजारात विविध कंपन्यांची अनेक प्रकारची तेले उपलब्ध आहेत. आज आपण या लेखातून पाम तेलाबद्दल जाणून घेणार आहोत.द इंडियन एक्स्प्रेसशी बोलताना लॉर्ड्स मार्क बायोटेकच्या पोषणतज्ज्ञ सांची तिवारी आणि पोषणतज्ज्ञ व रीलॉयस वेलनेसच्या संस्थापक डॉक्टर अस्मिता सावे यांनी पॅकबंद पदार्थांमधील सर्वांत सामान्य घटक 'पाम तेल' याबद्दल आरोग्यविषयक चिंता आणि या तेलाचे सेवन कमी करण्याचे काही उपाय सुचविले आहेत.आज बहुतेक खाद्यपदार्थांत पाम तेल वापरतात. पाम तेल हा वनस्पती तेलाचा एक प्रकार आहे. चांगल्या आरोग्यासाठी आपण ज्या तेलाचा स्वयंपाकघरात उपयोग करतो, ते तपासून पाहणेही अनेकदा आपण विसरतो. तथापि, दीर्घकाळपर्यंत अशा तेलाच्या सेवनामुळे आपल्या आरोग्यावर काय परिणाम होऊ शकतात याचा विचार करणेही महत्त्वाचे आहे. नॅशनल लायब्ररी ऑफ मेडिसीनमध्ये प्रकाशित केलेल्या २०१८ चा अभ्यासात असे आढळून आले की, पाम तेल हे वनस्पती तेल, खाद्यपदार्थ, अनेक वस्तू, लोकप्रिय स्नॅक्स व सौंदर्यप्रसाधने आदी गोष्टींमध्ये सर्वांत जास्त वापरले जाते.विविध कंपन्यांकडून पाम तेलाचा एवढ्या मोठ्या प्रमाणावर वापर केला जाण्याचे कारणही या अभ्यासात नमूद करण्यात आले आहे. पाम तेलाच्या वापरात झपाट्याने होणाऱ्या विस्ताराचे श्रेय इतर वनस्पती तेलाच्या पिकांच्या जवळपास चौप्पट उत्पादनास दिले जाते. समान उत्पादनखर्चासह अन्न उद्योगासाठी अनुकूल वैशिष्ट्ये तुलनेने जास्त आहे. अभ्यासात असे म्हटले आहे की, पाम तेलात इतर वनस्पती तेलांच्या तुलनेत चरबीचे प्रमाण जास्त आहे. तर, एक ग्राहक म्हणून आपण सर्वांनीच पाम तेल सेवनाच्या दुष्परिणामांबद्दल जागरूक असणे गरजेचे आहे.

# चवळीच्या भाजीने थायरॉईड बरा होतो का? वजन कमी करताना चवळी किती फायद्याची, तज्ज्ञांची स्पष्ट माहिती, वाचा



वजन कमी करण्यासाठी काय करावे यासाठी जगभरातील प्रत्येक सल्ला जर एकत्र घेऊन पुस्तक छापलं तर ते वाचेपर्यंतच माणूस थकून जाईल. हे सल्ले कदाचित एखाद्या व्यक्तीसाठी फायद्याचे ठरू शकतात तर एखाद्यासाठी याने नुकसान होऊ शकते. साहजिकच जीवनशैली, वास्तव्याचे ठिकाण, वय, लिंग सर्व गोष्टींचा वजनाशी व परिणामी वजन नियंत्रणात ठेवण्याशी संबंध असतोच. काही वेळा वजन कमी करण्याच्या प्रयत्नात आपण असेल उपाय करतो ते आपल्या चयापचयावर तसेच हार्मोन्स संतुलनावर विपरीत परिणाम करू शकतात व थायरॉईड, पीसीओडी सारख्या स्थिती उद्भवू शकतात. अलीकडेच या शक्यतेवर आधारित पोस्ट सोशल मीडियावर व्हायरल झाली होती. या पोस्टच्या मथळ्यानुसार, चवळीची भाजी वजन व थायरॉईड नियंत्रणात मदत करू शकते असा दावा करण्यात आला आहे.चवळीच्या व्हायरल पोस्टमध्ये काय लिहिलंय? पोषणतज्ज्ञ सिमरन वोहरा यांनी पोस्टमध्ये लिहिले होते की, चवळी ही वजन कमी करण्यास मदत करते. त्याचा उष्मांक कमी असून, त्यात फोलेट, प्रथिने आणि लोह यांचा मुबलक साठा असतो. १०० ग्रॅम चवळीमध्ये सुद्धा सुमारे ४४ टक्के फायबर असते जे वजन कमी करण्यास मदत करू शकते. हे फायबर शरीरातून विषारी घटक, अनावश्यक फॅट्स, व सेल्युलाइट काढून टाकण्यास मांडतात करतात. या विरघळणाऱ्या फायबरमुळे कोलेस्ट्रॉल आटोक्यात राहते, विशेषतः ज्यांना बद्धकोष्ठतेचा त्रास आहे त्यांच्यासाठी चवळी अत्यंत फायदेशीर आहे. डॉ संतोष पांडे, निसर्गोपचार आणि क्युपंक्चर, रेजुआ एनर्जी सेंटर, मुंबई यांनी इंडियन एक्सस्प्रेसला सांगितले की, चवळी ही 'सुपरबीन्स' म्हणून ओळखली जाते, यात प्रथिने, अँटिऑक्सिडंट्स, कार्बोहायड्रेट्स, भरपूर जीवनसत्त्वे व खनिजे असतात. थायरॉईडच्या वाढीस कारणीभूत ठरणारे हार्मोन्स तसे तर, शरीरातील अनेक हालचालींना नियंत्रित करण्यात मदत करतात, पण जेव्हा याच्या प्रमाणात गरजेपेक्षा जास्त वाढ होते तेव्हा लोकांना थकवा, केस गळणे, वजन वाढणे, मूड बदलणे आणि बद्धकोष्ठता यांसारखी लक्षणे जाणवतात. यावर उपचार सुचवायचा तर प्रामुख्याने निरोगी आहार आणि जीवनशैली स्वीकारणे आपल्या हातात आहे. चवळीमधील झिंक हे अशा हार्मोन्सचे संतुलन राखण्यास मदत करते म्हणून इतर उपायांसह जोडून आपल्या आहारात चवळीचा समावेश करणे हे थायरॉईडमध्ये मदत करू शकते दुसरीकडे, डॉ शुचिन बजाज, संस्थापक-संचालक, उजाला सिग्नस ग्रुप ऑफ हॉस्पिटल्स यांनी इंडियन एक्सस्प्रेसला सांगितले की याला कोणतेही वैज्ञानिक पुरावे नाहीत. चवळी (ब्लॅक-आयड बीन्स) थेट थायरॉईड नियंत्रित करू शकतात हे सिद्ध झालेले नाही. थायरॉईड ग्रंथी प्रामुख्याने शरीरातील हार्मोन्स आणि पोषक तत्वांद्वारे नियंत्रित केली जाते, जसे की आयोडीन, सेलेनियम आणि जस्त. थायरॉईडवर नियंत्रणासाठी आवश्यक पोषक तत्वांनी युक्त संतुलित आहार महत्त्वाचा असला तरी, केवळ चवळी खाल्ल्याने थायरॉईडवर नियंत्रण ठेवू शकता किंवा मात करू शकता, असे म्हणणे चुकीचे ठरेल.दरम्यान, डॉ. बजाज यांनी आवर्जून सांगितले की, चवळी किंवा इतर कोणत्याही एका भाजीवर अवलंबून राहू नका. विविध पोषक पदार्थासह संतुलित आहार घेतल्यास थायरॉईड बरा होण्यास नक्की मदत होऊ शकते. याशिवाय तुमची विशिष्ट आरोग्य स्थिती लक्षात घेण्यासाठी तुमच्या वैद्यकीय रेकॉर्ड्सची माहिती असलेल्या तज्ज्ञांचा सल्ला आवर्जून घ्या.

# रंगपंचमीला कोणते रंग वापराल? रंगांचा त्रास होऊ नये म्हणून काय काळजी घ्याल?

होळी आणि रंगपंचमी या दिवसांची सगळेजण फार उत्सुकतेने वाट पाहत असतात. या दिवशी काय काय मजा करायची या योजना आधीपासूनच लोक करून ठेवतात. बाजारात मिळणारे विविध प्रकारचे रंग एकमेकांना लावून आपण ही रंगपंचमी साजरी करत असतो. परंतु यातील काही रंगांमुळे आपल्या त्वचेला हानी पोहोचू शकते त्यामुळे रंगपंचमी खेळताना काळजी घेणे आवश्यक असते. गेल्या काही वर्षांपासून सामान्य जनतेमध्ये रंगांमुळे होणारी शरीराची हानी व त्यामुळे सेंद्रिय रंगांच्या वापराबद्दलची जागरूकता आलेली आहे. कृत्रिम किंवा अजैविक रंग हे ल्युमिनियम, पारा, मोरचूद, जस्त, ऍसबेसटॉस, कथिल, क्रोमियम, कॅडमियम वगैरे धातूंपासून बनवलेले असतात. यांच्या वापरामुळे त्वचेला जळजळ होणे, अंगावर पुरळ येणे, त्वचा लाल होणे, खाज येणे वगैरे दुष्परिणाम होऊ शकतात. तसंच रंगाची पूड जर खरखरीत असेल तर त्वचेवर ओरखडे ही उठू शकतात. असे रंग हवेत पसरल्यामुळे प्रदूषण होऊन पर्यावरणाची देखील हानी होते. रंगपंचमीचा जर आनंद घ्यायचा असेल तर रंगपंचमी खेळताना खालील काळजी जरूर घ्यावी...तर मग आम्ही तुमच्याबरोबर येतो, लोकसभा निवडणुकीआधी उद्धव ठाकरेंचं मोठं वक्तव्य रंगपंचमी खेळण्यास जाण्यापूर्वी सर्व अंगाला खोबरेल तेल किंवा मॉइश्चरायझर लावून मगच बाहेर पडावे. त्यामुळे लावलेल्या रंगाचा थेट त्वचेला संपर्क होण्यास काही प्रमाणात प्रतिबंध होतो. तसेच रंगपंचमी खेळायला जाताना पायघोळ कपडे घालावेत, जेणेकरून रंगांचा संपर्क शरीराला कमीत कमी होईल. रंग खेळण्यासाठी म्हणून फक्त सेंद्रिय रंगांचा वापर करावा. हे रंग पर्यावरण स्नेही असतात. हे रंग हळद, कृषी उत्पादन, वेगवेगळी पिके, फळे, फुले व भाज्या यांपासून बनवलेले असतात. त्यांचा त्वचेवर दुष्परिणाम होत नाही. रंगपंचमी खेळण्यास जाण्यापूर्वी भरपेट नाश्ता करून जाणे व अध्येमध्ये भरपूर पाणी पिणे आवश्यक आहे. त्यामुळे त्वचेमध्ये पाण्याचा अंश टिकून राहील व जे रंग त्वचेमध्ये शोषले जाऊन शरीराला अंतर्गत हानी पोहोचू शकते ते लघवीवाटे लवकर बाहेर उत्सर्जित केले जातील.रंग खेळून झाल्यानंतर रंग काढण्यासाठी काहीजण तीव्र रसायनांचा वापर करतात उदा घासलेट. पण असे केल्यामुळे त्वचेला आणखी हानी पोहोचू शकते. तसेच काहीजण काथ्या किंवा प्युमिस स्टोन वापरून त्वचा घासतात. तसे काहीही करू नये. काही रंग जर त्वचेमध्ये भिनले असतील तर ते हळूहळू निघून जातात कारण आपल्या बाह्यत्वचेच्या पेशी या काही दिवसातच वर वर येऊन निघून जातात. त्यामुळे अशा रंगांचा डाग कधीही कायमचा राहत नाही हे लक्षात घ्यावे. त्यामुळे रंग खेळून आल्यानंतर नेहमीप्रमाणे साबण लावून आंघोळ करावी. सौम्य क्लीनसरने चेहरा धुवावा. शाम्पू लावून केस धुवावेत. त्वचा जास्त घासून रंग काढण्याचा प्रयत्न करू नये. आंघोळीनंतर त्वचेला मॉइश्चरायझर किंवा एलोवेरा जेल लावावे.

# नैसर्गिक रंग देणारे बहुगुणी स्टाझॅनथीन तुम्हाला माहीत आहे का?


-डॉ. गिरीश ब. महाजन, सूक्ष्मजीव शास्त्रज्ञ रेस्टॉरंट्समध्ये कोळंबी आणि सालमनच्या स्वादिष्ट खाद्यपदार्थांच्या चकचकीत दुनियेचा शोध घेत असताना, त्यांचे आकर्षक आणि मंत्रमुग्ध करणारे गुलाबी-लाल रंग आपल्या नजर खिळवून ठेवतात आणि आपली भूक जागृत करतात. परंतु, जेव्हा आपण आपल्या स्वतःच्या स्वयंपाकघरात हे पदार्थ पुन्हा तयार करण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा तोच मंत्रमुग्ध करणारा रंग आपल्यापासून दूर जातो. असे का, याचा विचार आपण करत राहतो. आपल्या घरगुती निर्मिती इतक्या वेगळ्या का दिसतात असा प्रश्न पडतो. पण आतापर्यंत, तुम्ही कदाचित आधीच उत्तराचा अंदाज लावला असेल. होय, तुमचे बरोबर आहे. रेस्टॉरंट्समध्ये ते चमकदार लाल-गुलाबी रंगाचे नैसर्गिक पौ ष्टिक रंगद्रव्य वापरतात.खाद्यपदार्थांच्या आकर्षक नैसर्गिक रंगांव्यतिरिक्त, गेल्या दशकभरात आरोग्य जागरूकतेमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. विविध समाज माध्यमांमुळे ती अधिक चोखंदळ झाली आहे. आरोग्यपूरक पारंपारिक स्त्रोतांवर अवलंबून न राहता ग्राहक आता त्यांचे लक्ष निरोगी अपारंपरिक पर्यायांकडे वळवत आहेत. आरोग्यदायी आणि नैसर्गिक रंगद्रव्यांच्या विस्तृत क्षेत्रात, एक रत्न अस्तित्वात आहे जे केवळ त्याच्या चित्ताकर्षक रंगांनीच मोहित करत नाही तर त्याच्या असंख्य आरोग्यदायी फायद्यांसह कुतूहल निर्माण करते. तर जाणून घेऊया स्टाझॅनथीनला बद्दल, ज्याला कॅरोटीनॉइड्सचा राजा म्हणून ओळखले जाते. स्टाझॅनथीन हे नैसर्गिकरित्या आढळणारे आणि तैलरूपी द्रावणांत विरघळणारे रंगद्रव्य आहे जे झान्थोफिल गटातील रंगद्रव्य म्हणून ओळखले जाते. स्टाझॅनथीनचा उगम, उपयोग आणि त्याचे जडणघडण यासंबंधी माहिती घेऊ. काय आहे स्टाझॅनथीन? स्टाझॅनथीन हे कॅरोटीनॉइड गटातील रंगद्रव्य आहे ज्यातील विविध अणूंची संरचना वैशिष्ट्यपूर्ण असते. तसेच यात कार्बन आणि ऑक्सिजनच्या अणूंच्या विशिष्ट मांडणीसह संयुग्मित कार्बन- कार्बन दुहेरी बंध आहेत. स्टाझॅनथीनच्या कार्यक्षमतेच्या केंद्रस्थानी त्याची ही वैशिष्ट्यपूर्ण आण्विक रचना आहे. निसर्गातील रेणूंच्या विशिष्ट रचनेचा स्टाझॅनथीन एक उत्कृष्ट नमुना मानला जातो. त्यातील अनेक संयुग्मित दुहेरी बंध प्रणाली, आणि त्याच्या टोकांना असलेले किटो आणि हायड्रॉक्सिल गटांची उपस्थिती, स्टाझॅनथीन रेणूला अतुलनीय स्थिरता आणि अँटिऑक्सिडंटचे सामर्थ्य देतात. या अनोख्या संरचनेमुळे इतर अँटिऑक्सिडंट्सच्या तुलनेत ऑक्सिडेटिव्ह हानीपासून स्टाझॅनथीन उच्च संरक्षण प्रदान करते. कारण एकाच वेळी अनेक हानिकारक मुक्त रॅडिकल्सना रोखण्याची व नष्ट करण्याची क्षमता या रंगद्रव्यात आहे. त्याच्या एका रेणूचे वजन ५९६.८४ डाल्टन असून रेणूसूत्र आहे. म्हणजेच याच्या एका रेणूमध्ये ४० कार्बन अणू, ५२ हायड्रोजन अणू आणि ४ ऑक्सिजन अणू यांचा समावेश असतो. ११ कार्बन- कार्बन दुहेरी बंध आणि हायड्रॉक्सी आणि किटो गटांमुळे उपस्थितीमुळे, ते इतर रासायनिक गटांद्वारे सहजपणे जोडले जाऊ शकतात. हे रचनात्मक गुण यास इतर कॅरोटीनोइड्सपासून वेगळे ठरविते. त्यामुळेच हे एक शक्तिशाली अँटीएजिंग एजंट् ठरते.शोधाचा इतिहास स्टाझॅनथीनचा शोध हा निसर्गाच्या चमत्काराचा पुरावा आहे. १९३८ मध्ये नोबेल पारितोषिक विजेते रिचर्ड कुहन यांनी लॉबस्टरमधून स्टाझॅनथीनचा शोध लावला होता. प्रोफेसर बेसिल वीडन यांनी १९७५ मध्ये संश्लेषित स्टाझॅनथीनची रचना सर्वप्रथम जगासमोर मांडली. त्याने प्रथम हे संयुग सालमनच्या मांसापासून वेगळे केले आणि नंतर रासायनिक प्रक्रियांद्वारे या रंगद्रव्याचे संश्लेषण केले. जपानी शास्त्रज्ञांच्या संशोधनानंतर १९८० पासून स्टाझॅनथीनची पौष्टिक पूरक अन्नघटक म्हणून त्याची क्षमता ओळखली गेली. तेव्हापासून, स्टाझॅनथीनने शास्त्रज्ञ समुदाय आणि ग्राहक दोघांचेही लक्ष वेधून घेतले आहे.स्टाझॅनथीनचे प्रकार स्टाझॅनथीन दोन मुख्य स्वरूपात अस्तित्वात आहे: कृत्रिम आणि नैसर्गिक. सिंथेटिक (कृत्रिम) स्टाझॅनथीन रासायनिक रीतीने तयार केले जाते आणि सामान्यतः व्यावसायिक प्रयोगांमध्ये वापरले जाते, तर नैसर्गिक स्टाझॅनथीन हे सूक्ष्मशैवाल, यीस्ट, क्रस्टेशियन्स आणि काही माशांच्या प्रजातींसारख्या जैविक स्त्रोतांपासून मिळविले जाते. मानवी वापरामध्ये त्याच्या उत्कृष्ट जैवउपलब्धता आणि परिणामकारकतेसाठी नैसर्गिक स्वरूपाला प्राधान्य दिले जाते. सिंथेटिक स्टाझॅनथीनचा वापर बहुधा मत्स्यपालनासाठी खाद्य म्हणून केला जातो तर नैसर्गिक स्टाझॅनथीन हे मानवासाठी अन्न, आहारातील पूरक घटक, सौंदर्यप्रसाधने आणि मत्स्यपालनासाठी देखील वापरले जाते. नैसर्गिक स्त्रोताच्या जैविकदृष्ट्या उत्कृष्ट गुणवत्तेमुळे ते कृत्रिम समकक्षांच्या तुलनेत ७-८ पटीने महाग असते. स्टाझॅनथीनची संसाधने अनेक प्रकारची शैवाले आणि यीस्ट प्रजाती या रंगद्रव्याचे संश्लेषण करतात तरीही सूक्ष्मशैवाल, विशेषतः हेमॅटोकोकस प्लुव्हियालिस, स्टाझॅनथीनचा प्राथमिक आणि व्यावसायिकदृष्ट्या व्यवहार्य नैसर्गिक संसाधन आहे. प्रखर सूर्यप्रकाशासारख्या पर्यावरणीय ताणतणावांना प्रतिसाद म्हणून स्टाझॅनथीन तयार करण्याच्या आणि जमा करण्याच्या त्याच्या उल्लेखनीय क्षमतेसाठी ओळखले जाणारे, हे सूक्ष्मशैवाल जलीय अन्न साखळीचा पाया म्हणून काम करते. या सूक्ष्मशैवालमध्ये त्याच्या १०० ग्रॅम कोरड्या पावडरमध्ये सुमारे ३.८ ग्रॅम पर्यंत स्टाझॅनथीन जमा होते. स्टाझॅनथीन -समृद्ध सूक्ष्मशैवालचा फायदा होतो, कोळंबी आणि क्रिल सारख्या क्रस्टेशियन्स तसेच सालमन



आणि ट्राउट सारख्या माशांना, कारण त्या शैवालाचा तवंग त्यांचे खाद्य असते.स्टाझॅनथीनचे महत्व २०२३ मध्ये जागतिक स्टाझॅनथीन बाजाराचा आकार सुमारे २१७९ दशलक्ष अमेरिकन डॉलर इतका होता. २०३१ पर्यंत स्टाझॅनथीनची बाजारपेठ मूल्य प्रतिवर्ष साधारण १७% दराने सुमारे ७५३६ दशलक्ष अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. हॉस्पिटलायझेशनच्या उच्च खर्चामुळे आहारातील पूरक आहारांना प्राधान्य देणे आणि निरोगी जीवनशैलीसाठी पोषणाविषयी वाढती जागरूकता यासारख्या कारणांमुळे नैसर्गिक अँटिऑक्सिडंट्स आणि न्यूट्रास्युटिकल्सची मागणी वाढण्याची अपेक्षा आहे. यामुळे जागतिक बाजारपेठेतील मागणी वाढते. रंगद्रव्य म्हणून त्याच्या भूमिकेच्या पलीकडे, स्टाझॅनथीन च्या अतिरिक्त अँटिऑक्सिडंट गुणधर्मांमुळे ते शरीरातील ऑक्सिडेटिव्ह तणाव आणि जळजळ विरूद्ध एक शक्तिशाली बचाव करणारे ठरते. विविध संशोधनात स्टाझॅनथीनचे हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी महत्व, रोगप्रतिकारक प्रणाली मॉड्युलेशन मधील त्याचे कार्य, आणि अतिनील किरणांच्या हानीपासून त्वचेचे संरक्षण यासह त्याचे विस्तृत आरोग्य फायदे प्रदर्शित केले आहेत.स्टाझॅनथीनची उपयोजने स्टाझॅनथीनचे अष्टपैलुत्व औषधी, सौंदर्य प्रसाधने, पशुखाद्य आणि मत्स्यपालन यासह विविध उद्योगांमध्ये विस्तारले आहे. फार्मास्युटिकल्समध्ये वयोवृद्धीशी संबंधित मॅक्युलर डिजेनेरेशन आणि न्यूरोडीजेनेरेटिव्ह रोगांसारख्या परिस्थितींवरील संभाव्य उपचारांसाठी त्याचे अँटिऑक्सिडंट आणि दाहक-विरोधी गुणधर्म वापरले जातात. सौंदर्यप्रसाधनांमध्ये, मुक्त रॅडिकल्स काढून टाकण्याच्या आणि त्वचेची लवचिकता सुधारण्याच्या क्षमतेसाठी स्टाझॅनथीनचा वापर केला जातो. ज्यामुळे ते वृद्धत्वविरोधी स्किनकेअर उत्पादनांमध्ये मुख्य घटक ठरले आहे. स्टाझॅनथीनचा वापर त्वचेला निरोगी ठेवण्यासाठीच्या लोशनमध्ये केला जातो. अद्यावत संशोधनात असे आढळून आले आहे की स्टाझॅनथीन हृदयविकार टाळू शकते आणि कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करू शकते. काही अभ्यासात असे दिसून आले आहे की स्टाझॅनथीन संधिवात संबंधित दाह आणि वेदना लक्षणे कमी करण्यास सक्षम आहे. संशोधकांनी असे देखील सिद्ध केले आहे की स्टाझॅनथीन शुक्राणूंची संख्या आणि हालचाल यात सकारात्मक बदल घडविते आणि एस्टॅक्सॅन्थिनचा उच्च डोस मिळालेल्या गटातील रोग्यांची प्रजनन क्षमता सुधारली. स्टाझॅनथीनची काही उत्पादने स्टाझॅनथीन प्रामुख्याने सागरी जीवांमध्ये आढळते आणि विशिष्ट सीफूडमध्ये ते विशेषतः विपुल प्रमाणात आढळते. सालमन, कोळंबी, क्रिल, लॉबस्टर आणि क्रॅब हे सामान्यतः खाल्ल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांपैकी आहेत ज्यात स्टाझॅनथीन असते. याव्यतिरिक्त, क्रिल ऑइल सारख्या सागरी स्त्रोतांपासून मिळविलेले तेल स्टाझॅनथीनयुक्त पूरक खाद्य म्हणून वापरले जाते. स्टाझॅनथीन सामान्यतः विविध खाद्यपदार्थ आणि कॉस्मेटिक उत्पादनांमध्ये आढळते. स्टाझॅनथीन -संबंधित काही लोकप्रिय ब्रँड्समध्ये नुट्रेक्स हवाई, सोलगार, नॉव फूड्स, जरोंव फॉर्मूलास, आणि इतर बरेच समाविष्ट आहेत. हे ब्रँड ग्राहकांच्या हितासाठी स्टाझॅनथीनच्या अँटिऑक्सिडंट गुणधर्मांचा उपयोग करून पूरक द्रव्ये, स्किनकेअर आणि इतर फॉर्म्युलेशनमध्ये स्टाझॅनथीनचा समावेश करतात. भारतात, स्टासुप्रीम, स्टारिअल, नुट्रेक्स हवाई, बायोस्टीन आणि नॉव फूड्स स्टाझॅनथीनसारखे त्याचे ब्रँड लोकप्रिय होत आहेत. त्यांच्या प्रसिद्धीमध्ये योगदान देणाऱ्या घटकांमध्ये त्यांच्या पासून मिळणारा आरोग्य लाभ व त्याद्वारे मौखिक प्रसिद्धी, विपणन प्रयत्न, त्यांची त्वरित उपलब्धता, आणि मीडिया कव्हरेज यांचा समावेश होतो.भविष्यातील व्याप्ती स्टाझॅनथीनविषयी सध्या जे संशोधन चालू आहे त्यावरून लक्षात येते की भविष्यात या उल्लेखनीय रंगद्रव्यासाठी आशादायक शक्यता आहेत. सध्या चालू असलेले अभ्यास कर्करोग प्रतिबंध, क्रीडापटूंचे पोषण आणि पर्यावरण संरक्षण यासारख्या क्षेत्रांमध्ये आहेत. स्टाझॅनथीन हे नैसर्गिक रंगद्रव्य सर्वांगीण आरोग्य आणि शाश्वत उपायांच्या शोधात एक प्रमुख संयुग म्हणून उदयास येत आहे. स्टाझॅनथीन हे निसर्गाच्या सर्वांगीण विविधतेचे एक ज्वलंत उदाहरण आहे. त्याच्या विलक्षण आकर्षक रंगछटा आणि आरोग्य-प्रोत्साहन गुणधर्मांनी सर्वांना मोहित केलेले आहे. सूक्ष्म शैवालमधील त्याच्या सर्वसाधारण उत्पत्तीपासून ते विविध उद्योगांमध्ये त्याच्या विविध अनुप्रयोगांपर्यंत, स्टाझॅनथीनचे महत्व कळते. नैसर्गिक जगामध्ये लपलेल्या अमर्याद चमत्कारांची एक झलक देते. स्टाझॅनथीन आणि तत्सम रेणूंमुळे निरोगी, व उज्वल भविष्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

# लातूर लोकसभेवर काँग्रेसचा झेंडा फडकवण्यासाठी सज्ज व्हा संधीचे सोने करू; काँग्रेसचा झेंडा फडकवू आमदार धिरज देशमुख यांचे पदाधिकारी, कार्यकर्त्यांना आवाहन

लातूर :- लातूर लोकसभेची उमेदवारी आपल्यालाच मिळावी, असे राज्यातील अनेक नेत्यांना वाटते. पण, काँग्रेस पक्षाने दूरदृष्टी लाभलेले, उच्चशिक्षित आणि भूमिपुत्र असलेले उमेदवार डॉ. शिवाजी काळगे यांच्या रूपाने आपल्याला दिले आहेत. या संधीचे सोने करून लातूर लोकसभेवर काँग्रेसचा झेंडा फडकवण्यासाठी सज्ज व्हा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस, 'लातूर ग्रामीण'चे आमदार श्री. धिरज विलासराव देशमुख यांनी येथे केले. लातूर लोकसभा मतदारसंघातून डॉ. शिवाजी काळगे यांना काँग्रेस पक्षातर्फे उमेदवारी जाहीर झाल्याबद्दल बाभळगाव येथे त्यांचा आमदार श्री. धिरज देशमुख यांच्या हस्ते रविवारी (ता. २४) सत्कार करण्यात आला. त्यानंतर काँग्रेस पक्षाचे सर्व तालुका अध्यक्ष, सर्व फ्रंटल जिल्हाध्यक्ष, विधानसभानिहाय पक्षाचे सर्व निरीक्षक व इतर पदाधिकारी यांची बैठक घेवून त्यांना आमदार श्री. धिरज देशमुख यांनी संबोधित





केले. लातूरची जागा अधिकाधिक मतांनी निवडून आणण्याचा एकत्रित संकल्प बैठकीत करण्यात आला. आमदार श्री. धिरज देशमुख म्हणाले, ही निवडणूक देशाला अधिक भक्कम करणारी, देशाला विकासाकडे घेवून जाणारी निवडणूक आहे. देशात इंडिया आघाडीची सत्ता आली तर लातूरच्या विकासाचे चक्र अधिक गतिमान होईल. त्यामुळे आपण सर्वांनी घरोघरी जावून काँग्रेसची ध्येयधोरणे, विचारधारा, आजवरची विकासकामे लोकांपर्यंत पोचविण्याचा निर्धार करूया. डॉ. शिवाजी काळगे यांनी आपल्या मनोगतात उमेदवारी मिळाल्याबद्दल काँग्रेस पक्षाचे व काँग्रेसच्या सर्व वरिष्ठ नेत्यांचे आभार मानले. एकदिलाने व एकजुटीने लढून या निवडणुकीत जिंकण्याचा संकल्प करू, असे आवाहनही त्यांनी केले. यावेळी माजी आमदार त्र्यंबक भिसे, अशोकराव पाटील निलंगेकर, श्रीशैल उटगे, किरण जाधव, भा. ई. नगराळे, विक्रांत गोजमगुंडे, यशवंतराव पाटील, अभय साळुंके, सर्जेराव मोरे, विजय देशमुख, रविंद्र काळे, जगदीश बावणे, अनुप शेळके, सुभाष घोडके, अनंतराव देशमुख, प्रवीण पाटील, शिवाजी हुडे, सुनील पडिले, समद पटेल, मन्मथ कीडे, मारुती पांडे, चंद्रकांत मद्दे, अरविंद भातांब्रे, एकनाथ पाटील, रमेश सूर्यवंशी, विजय पाटील, इम्रान सय्यद, प्रवीण सूर्यवंशी, मनोज पाटील, प्रताप पडिले, धनंजय देशमुख, लालासाहेब चव्हाण, सचिन दाताळ, गोविंद बोराडे, सुपर्ण जगताप, दगडूसाहेब पडिले, अजित माने, अनंत बारबोले, रघुनाथ शिंदे, निलेश देशमुख, राम स्वामी, मुकेश राजमाने, दिनेश नवगिरे, नरेश पवार, अनिल पाटील, सदाशिव कदम, सूरेश चव्हाण, राजेसाहेब सवई, अजित काळदाते, सिराजुद्दीन जहागिरदार, गोविंद देशमुख यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## वसंत मोरेंच्या 'हातोड्या'बाबत खा. कोल्हेंना विश्वास; 'राशप'मधील प्रवेशाचे संकेत

मुंबई/पुणे - महाराष्ट्र नवनिर्माण सेना सोडल्यानंतर माजी नगरसेवक वसंत मोरे यांनी लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक असल्याचे सांगितले. त्यासाठी, महाविकास आघाडीकडून त्यांना उमेदवारी मिळावी, यासाठी प्रयत्नही सुरू होते.

विशेष म्हणजे महाविकास आघाडीचे शिल्पकार आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांची त्यांनी भेट घेऊन चर्चाही केली होती. मात्र, काँग्रेसकडून पुण्यातील उमेदवारी जाहीर झाली असून आमदार रविंद्र धंगेकरांना महाविकास आघाडीने पुणे लोकसभेच्या मैदानात उतरवले आहे. त्यामुळे, वसंत मोरेंची नेमकी भूमिका काय, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. त्यातच, खासदार अमोल कोल्हे यांनी आज वसंत मोरेंची भेट घेऊन विश्वास व्यक्त करत वेगळेच संकेत दिले आहेत.

महाविकास आघाडीतील पुणे लोकसभा मतदारसंघाचा उमेदवार जाहीर झाल्यानंतर, आता वसंत मोरे काय भूमिका घेतील, याकडे पुणेकरांचे लक्ष लागले होते. मी एकला चलो रे च्या भूमिकेत असून त्यावर ठाम आहे. त्यामुळे, पुण्यातील निवडणुक मी एकतर्फी होऊ देणार नाही, असे सांगत त्यांनी आपल्या अपक्ष उमेदवारीचा पुर्नउच्चार केला होता. मात्र, आज खासदार अमोल कोल्हे यांनी वसंत मोरेंची भेट घेऊन त्यांच्या हातोड्याचा उल्लेख करत विश्वास व्यक्त केला आहे.

''जनसंवाद दौऱ्याच्या निमित्ताने आमचे मित्र तथा माजी नगरसेवक वसंत मोरे यांच्या जनता दरबारास सदिच्छा भेट दिली. वसंततात्या मोरे हे धडाडीचे नेते तथा नेहमी सत्याच्या, न्यायाच्या बाजूने उभे राहणारे कार्यकर्ते म्हणून सर्वांना परिचित आहे. वसंततात्यांचा हातोडा यावेळी न्यायाच्या बाजूने उभा राहणार हा विश्वास आहे,'' असे अमोल कोल्हेंनी म्हटलं आहे. अमोल कोल्हेंच्या या विधानामुळे वसंत मोरे शरद पवारांच्या राष्ट्रवादीत सहभागी होतील, अशी चर्चा जोर धरु लागली आहे. कारण, यापर्वी आमदार निलेश लंकेबाबत खा. कोल्हेंनी असेच संकेत दिले होते. त्यानंतर, लंकेंनी शरद पवारांची भेट घेऊन, मी त्यांच्याच विचारांचा माणूस असल्याचे स्पष्ट केले. तर, अहमदनगर मतदारसंघातून त्यांना महाविकास आघाडीकडून उमेदवारीही देण्यात येणार असल्याचे समजते.

दरम्यान, वसंत मोरेंनी शरद पवारांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केल्यास बारामती लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांना मदत होऊ शकते. तर, आगामी विधानसभा निवडणुकांवेळी वसंत मोरेंना संधी दिली जाऊ शकते. मात्र, तुर्तात वसंत मोरेंनी आपली भूमिका जाहीर केली नसून पुणेकरांवर निर्णय सोपवला आहे.

## पवित्र माहे रमजान निमित्त सात वर्षीय कुरेशी याचा रोजा पूण

किनवट.ता.प्रतिनिधी.(शेख शौकत) किनवट माहूर मतदारसंघ वाई बाजार येथील प्रभाग क्रमांक पाच मध्ये राहणारे फिरोज सत्तार कुरेशी यांची चिमुकली आश्मिरा फिरोज कुरेशी यांनी २१ मार्च रोजी पवित्र रमजान महिन्याचा ९ वा रोजा आश्मिराच्या जीवनातील पहिला रोजा अल्लाहाच्या अज्ञाचे पालन करीत पूर्ण करत पहाटे ४ :३० वा. निहारी (सहरी) करत रोजा पकडला व संध्याकाळी ६ ३६ मिनिटांनी रोजा (इफ्तार) उपवास सोडला या उपवासाच्या १४ तसाचा



अल्लाह च्या आज्ञाचे पालन करीत आपल्या पोटात एकही थेंब पाणी व अन्नाचा एकही कण जाऊ दिला नाही. आपल्या आयुष्यातील हा पहिला रोजा यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल त्यांच्या परिवारातर्फे (आजोबा) अब्दुल सत्तार कुरेशी, सायराबी (आजी) जविद सत्तार कुरेशी (मोठे बाबा) रुखयाबी जविद कुरेशी (मोठीआई) फिरोज सत्तार कुरेशी (वडील) रेश्मा बी (आई) बहीण शिफा, सबा, जिशान, अलीजा, अफान, अरमान, (भाऊ) आदीतर्फे दुवा आशीर्वाद देऊन कौतुक करण्यात आले.

## फाल्गुनातील बंजारा होळी उत्सवातून संस्कृतीचे जतन तांड्या-तांड्यात घुमतोय होळीचा सूर !

किनवट.ता.प्रतिनिधी. (शेख शौकत) सण हा संपूर्ण भारतवषांत सप्तरंगांची उधळण करणारा म्हणून ओळखला जातो. महाराष्ट्रातील बंजारा समाजाचे लोकंही हा सण आपल्या पारंपारिक पद्धतीने साजरा करतात. प्रत्येक समाजातील लोकसंस्कृती, सण आणि उत्सवामध्ये काही वैशिष्ट्ये असतात. त्याप्रमाणे बंजारा लोकसंस्कृती मध्येही होळी उत्सवाचे विशेष महत्य आहे. बंजारा समाजाचा होळीच्या उत्सवात, बंजारा समाजाच्या प्रथा, रुडी, परंपरा आणि संस्कृतीचे दर्शन घडत असते. नांदेड जिल्ह्यातील माहूर, किनवट हे दोन त्यातील बंजारा बहुल आहेत. या तालक्यातील अनेक तांड्यावर बंजारा समाजाच्या लोकांचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य आहे. बंजारा समाजात होळी, दिवाळी अ नागपंचमीला घरच्या पितरांना पूजले जाते व होळीनिमित्त सकाळो उठून वळवट व भात करून शुद्ध तुपामध्ये अग्नीला देऊन पूजन करतात, त्यास असे म्हणतात. याचा अर्थ चलीमध्ये अग्नीला घास देणे असा होतो. बंजारा समाजामध्ये होळी हा सण महत्त्वाचा मानला जातो. प्रत्येक तांडयामध्ये दिवसांपासून महिला व परुष होळी खेळायला सुरुवात करतात. यानिमित्त महिला व पुरुष वेगवेगळे ताल धरून नाचतात, खरं तर होळीच्या आधो येणाया दांडी पौर्णिमेपासून त्यांच्या होळीला सरुवात होते. या गीतांना 'लेगीगीत' असेही महटले जाते.



'गेर', 'फगवा', अशा अनेक परंपरा जोपासल्या जातात, बंजारा समाजाचा संघर्ष, शिक्षणाचे महत्त्व, व्यसनमुक्ती किंवा मग वात्रटीका अशा स्वख्यात ही गाणी असत्तात. बंजारा समाजाच्या होळीत पाल, गैर, फगवा अशा अनेक परंपरा जोपासल्या जातात. या दिवशी फगवा मागणं हा महिलांचा जनू हक्कच असतो. तो मिळविण्यासाठी महिला पुरुषांना काउने मारतात. हा संपूर्ण कार्यक्रम तांडा प्रमख नाईकाच्या घरासमोर साजरा होतो. होळी सणात आणि गेर आगळी वेगळी पद्धत वंजारा समाजात होळी सणात आणि गैर हो एक आगळी चंगळो पद्धत आहे. घंडविषयी बंजारा लोकांची एक दंतकथा आहे. पूर्वी एक भंडी नावाची राक्षसीण रात्री तांड्यात येऊन लहान चाऱ्यांना खात असे. या प्रकाराला कंटाळून तांड्ङातील बंजारा लोक नायकाकडे सभा भरवितात. सर्वजण त्या राक्षसिणीला मारण्याचे ठरवितात. एका पौर्णिमेच्या रात्री लाठ्याकाठ्या, गोफण घेऊन सर्व जण जमा होतात. नेहमीप्रमाणे राक्षसीण तांड्यात येते व वंजारा टोळी पाहून नायकाच्या घरात घसते. नायकाच्या घरातून बाहेर काढून सर्वजणा राक्षसिणीला तर करतात आणि तिची होळी करतात. अशा प्रकारे लहान बाळांच्या जीवनावरील धोका टळला आणि राक्षसिणीचा अंत झाला म्हणून बंजारा लोक होल्ली सण साजरा करतात, अशी एक दंतकथा आहे. त्यामुळे बंजारा तांड्यावर सकाळी होळी पेटविण्याची परंपरा आहे. सोबतच वर्षभरात जन्मलेल्या मुलांचा धुंड (वाढदिवस) याच होळीच्या उत्सवामध्येच साजरा करतात. अशी असते आगळीवेगळी बंजारा होळी. उपवर मले 'गेरीया' प्रथेनसार होतात सहभागी ज्यांचे लग्न या वर्षी करावयाचे आहे अशी उपचर मले होळीसाठी लाकडे जमा करतात, या उपवर मुलांना 'गेरीया' असं म्हटलं जातं, त्यानंतर गेरीया होळी भोवती प्रदक्षिणा घालून विहिरीचर होळीचा प्रसाद खातात. यासोबतच अनेक रूढी, परंपरा या बंजारा होळीत आहेत.

### ना. अतुल सावे, खा. शृंगारे, आ. निलंगेकर, आ. पवार आदींच्या उपस्थितीत

## ग्रामीण विधानसभेतील भाजपा कार्यकर्त्यांचा २८ मार्च रोजी लातूर येथे मेळावा - आ. कराड

लातूर : - लातूर लोकसभा मतदार संघातील भाजपा महायुतीचे अधिकृत उमेदवार खा. सुधाकर शृंगारे यांच्या प्रचारार्थ लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांचा भव्य मेळावा राज्याचे इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण मंत्री ना. अतूल सावे यांच्यासह इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत दि. २८ मार्च २०२४ गुरुवार रोजी लातूर येथे आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यास भाजपाचे सर्व लोकप्रतिनिधी, पदाधिका-यांसह कार्यकर्त्यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन करण्यात आले आहे. लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपा कार्यकर्त्यांचा मेळावा भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला असून या मेळाव्यास राज्याचे इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण मंत्री ना. अतूल सावे, भाजपा महायुतीचे उमेदवार खा. सुधाकर शृंगारे, जिल्हयाचे माजी पालकमंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, औसा विधानसभेचे आ. अभिमन्यू पवार, भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष दिलीपराव देशमुख, राज्य कृषीमुल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, माजी आमदार सुधाकर भालेराव, गोविंदअण्णा केंद्रे, बब्रुवान खंदाडे, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते गणेशदादा हाके, लातूर लोकसभा निवडणूक प्रभारी प्रा. किरण पाटील, भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, लातूर लोकसभा निवडणूक प्रमुख राहूल केंद्रे यांच्या अनेक मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

सदरील भाजपा कार्यकर्त्यांचा मेळावा दि. २८ मार्च २०२४ गुरुवार रोजी लातूर येथील भक्ती-शक्ती मंगल कार्यालयात सकाळी ११ वाजता आयोजित करण्यात आला आहे तेव्हा लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाच्या सर्व लोकप्रतिनिधी, पक्ष पदाधिकारी, सुपर वॉरीअर्स, शक्तीकेंद्र प्रमुख, बुध प्रमुख आणि भाजपा कार्यकर्त्यासह मतदार बंधू भगिनींनी हजारोंच्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन भाजपाचे लातूर ग्रामीण विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, रेणापूर तालुकाध्यक्ष ॲड. दशरथ सरवदे, लातूर तालुकाध्यक्ष बन्सी भिसे, भादा सर्कलचे पद्माकर चिंचोलकर यांनी केले आहे.

## धूलिवंदन खेळून तलावात अंघोळीसाठी गेलेल्या तरुणाचा बुडून मृत्यू, जळगावमधील घटना

जळगाव :- धूलिवंदन खेळून आंघोळीसाठी गेलेल्या धरणगाव येथील एका तरुणाचा धरणगाव तालुक्यातील जांभोरे गावाजवळ बुडून मृत्यू झाला. (दि. २५) रोजी दुपारी १ वाजेच्या सुमारास ही घटना उघड झाली. याप्रकरणी धरणगाव पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.धरणगाव येथील ज्ञानेश्वर काशिनाथ महाजन हा तरुण सकाळी धूलिवंदन खेळल्यानंतर आपल्या तीन ते चार मित्रांसोबत धरणगावजवळ असलेल्या जांभोरा शिवारात असलेल्या



तलावावर अंघोळीसाठी गेला होता. अंघोळीसाठी पाण्यात उडी घेतल्यानंतर काही वेळातच ज्ञानेश्वर बुडायला लागला. मित्रांनी त्याला वाचवण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना यश आले नाही.. तो आई, वडील, भाऊ, बहिणीसह राहत होता.

## राज्याच्या शाहिरी महोत्सवात घुमली लातूरच्या आम्ही जिजाऊंच्या लेकी शाहीर पथकाची ललकारी सांस्कृतिक क्षेत्रातही लातूर पॅटर्न : महिला शाहिरी पथकाचा दिशादर्शक प्रयोग

लातूर दि.२५-०३-२०२४ महाराष्ट्र शासन सांस्कृतिक संचालनालय द्वारा इचलकरंजी कोल्हापूर या ठिकाणी राज्य शाहिरी महोत्सवाचे आयोजन दिनांक २० ते २२ मार्च २०२४ या कालावधीत श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे सभागृह, इचलकरंजी या ठिकाणी करण्यात आले होते. यामध्ये लातूरच्या आम्ही जिजाऊंच्या लेकी महिला शाहिरी पथकासह नऊ शाहिरी पथकांनी सहभाग नोंदविला होता. यामध्ये लातूरच्या शाहिरी पथकाच्या कार्यक्रमाला प्रेक्षकांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून लातूरच्या शाहिरी पथकाचा कार्यक्रम राज्यासाठी दिशादर्शक ठरलेला आहे.महाराष्ट्रातील नऊ लोकप्रिय शाहिरी पथकांची निवड या महोत्सवासाठी करण्यात आली होती. यामध्ये शिवशाहीर संतोष साळुंके निर्मित, आम्ही जिजाऊच्या लेकी या लातूर शहरातील महिला शाहिरी पथकाला या राज्यस्तरीय शाहिरी महोत्सवासाठी निमंत्रित करण्यात आले होते. या महोत्सवात राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्या चरित्रावर आधारित रोमहर्षक पोवाडे, स्फूर्ती गीते, लोकगीते या जिजाऊच्या लेकींनी राज्य शाहिरी महोत्सवात सादर केली. या महिला शाहिरी पथकाच्या कार्यक्रमाला प्रेक्षकांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून या शाहिरी पथकाने उपस्थित कोल्हापूरातील रसिक जणांची मने जिंकली. या महिला शाहीर पथकात गायत्री जाधव हिने दांडपट्टा, भाला व लाठीकाठी प्रदर्शन सादर करत लातूरकरांचा मराठी बाणा दाखवून दिला .या महिला शाहिरी पथकात डॉ. निशिगंधा संतोष साळुंके, शाहिरा ॲड. अपेक्षा डाके, गायत्री जाधव, स्नेहा शेवाळे, सायली पंडित,भक्ती पांचाळ ,कामाक्षा कोरके या महिला शाहिरांसह या पथकाचे संगीत संयोजक विश्वजीत पांचाळ, मनोज शिवलकर, राहुल गडेराव, राम झीरमाळे व चि.साहस संतोष साळुंके यांनी केले.मागच्या आठ वर्षांपासून सबंध महाराष्ट्रभर शाहिरी कलेचा प्रचार प्रसार करणार्या या पथकाला , राज्यस्तरीय शाहिरी महोत्सवात कला सादरीकरण करण्याची संधी मिळाली आणि त्या संधीचे सोनं करीत या महिला शाहिरी पथकाने राज्यात पहिला क्रमांक मिळवून सांस्कृतिक क्षेत्रातही लातूर पॅटर्न निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे त्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल शेषकुमार डाके, सूर्यकांत जोगदंड, पंडित चिगुरे, आर.एन.चव्हाण, साईनाथ लोमटे, व्यंकटेश कडने, राजेश कोळी, सतीश सुवर्णकार, शिलरत्न निलंगेकर, बालाजी भारती, संदीप शिरसाट , बाळासाहेब जाधव, गुड मॉर्निंग ग्रुपचे सर्व सदस्य व कलाक्षेत्रातील मान्यवरांनी आम्ही जिजाऊच्या लेकी या महिला शाहीर पथकातील सर्व कलावंतांचे कौतुक केले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE